


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १०१ * नांदेड * शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# देगलूर नाका परिसरातील खदानीत बुडून चार शाळकरी मुलांचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या देगलूर नाका भागात महापालिकेच्या एका गुत्तेदाराकडून सुरू असलेल्या कामामुळे तयार झालेल्या खदानीवर पोहण्यासाठी गेलेल्या चार शाळकरी मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

देगलूर नाका भागातील एमजीआर गार्डन परिसरात इस्लामपुरा भागातील ही मुले शाळा सुटल्यानंतर घरी जात होती. दरम्यान, हारूनबाग परिसरात एका मोठ्या खड्डयात पाणी साचलेले होते. उष्णतेमुळे पोहण्यासाठी मुले पाण्यात उतरली, मात्र पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे चारही मुले पाण्यात बुडाली. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी मुलांच्या चप्पला, बूट व शालेय गणवेश आढळून आले. घटनास्थळाला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली असून फायर ब्रिगेडचे जवान आणि जीवरक्षक दल यांनी परिश्रम घेत चारही मृतदेह पाण्या बाहेर काढले.

मृत मुलांची नावे मोहम्मद अली मोहमद ईद्रीस (वय १३), सय्यद फुरखान सय्यद फिरोज (वय १३), मोहमद अदनान मोहमद फिरोज (वय १०) आणि मोहमद रेहान (वय ११) अशी आहेत. सर्व मुले आठ ते बारा वयोगटातील असल्याचे सांगितले जात आहे. यातील मोहम्मद फुरखान आणि मोहम्मद रेहान हे दोन्ही भाऊ आहेत. चौघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढून विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले आहेत. अचानक घडलेल्या या घटनेमुळे पालकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. एकाचवेळी चार चिमुरड्यांचा जीव गेल्याने नांदेड शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या ठिकाणी महापालिकेमार्फत खाजगी कंत्राटदाराच्या माध्यमातून नाल्याचे काम सुरू असून, संबंधित खड्डा नेमका कोणी व कसा खणला याबाबत स्पष्टता नाही. घटनेची माहिती मिळताच एमआयएम



पक्षाचे नगरसेवक आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून या दुर्घटनेला जबाबदार कोण याची सखोल चौकशी सुरू आहे.

या भागात नाल्याचे काम सुरू असताना खड्ड्यांभोवती सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नव्हती, असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. महापालिकेच्या या हलगर्जीपणामुळेच निष्पाप मुलांचा जीव गेल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा केला असून पुढील तपास केला जात आहे.

### महापालिका आयुक्तांकडून समिती गठीत

महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी घटनेसाठी जबाबदार कोण आहे आणि खड्डा कोणत्या कामासाठी खोदण्यात आला होता, याची चौकशी करण्यासाठी द्विसदस्यीय समिती नेमली आहे. या समितीमध्ये अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मिर्झा फरहतुल्ला बेग यांचा समावेश आहे. या द्विसदस्यीय समितीने २४ तासांच्या आत सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मनपा आयुक्तांनी दिले आहेत. संबंधित कंत्राटदार किंवा अधिकारी यांच्याकडून सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, याची तपासणी ही समिती करणार आहे.

# पुढील चार दिवस जिल्ह्यात येलो अलर्ट; उष्मालाटेची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. १६ एप्रिल रोजी दुपारी १२:२१ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. १७, १८, १९, २० एप्रिल २०२६ हे चार दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाट असण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आलेली आहे.

दि. १८ एप्रिल २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाट असण्याची व दुपारनंतर संध्याकाळी विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची तसेच दि. ११ व २० एप्रिल २०२६ रोजी जिह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व



संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**उष्मालाट असताना काय करावे :** तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. अपस्मार, हृदयरोग, मूत्रपिंड, यकृतविषयक आजारांमुळे ज्यांना शरीरात द्रवपदार्थ टिकवण्याचा प्रश्न येतो, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच द्रवपदार्थ किंवा पाणी प्राशन करावे. ओआरएस म्हणजेच तोंडान प्यावयाचे शरीरातले पाणी वाढवणारे द्रवपदार्थ, घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळाच पाणी घ्या. हलक्या रंगाचे, वजनाला हलके आणि सैलसर सुती कपडे वापरा. घराबाहेर असाल तर डोके झाका. एखादे कापड वापरा, टोपी घाला किंवा छत्री बापरा. डोळ्यांच्या सुरक्षेसाठी गॉगल वापरा आणि उन्हापासून कातडीचाही बचाव करायला सनस्क्रीन वापरा. अतिउष्णतेमुळे ज्यांना सर्वाधिक हानी पोहोचेल असे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी किंवा स्थूल व्यक्तींची विशेष काळजी घ्या.

**काय टाळावे :** उन्हात जायचे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ३ मध्ये दुपारी बाहेर असताना श्रमाची कामे टाळा. अनवाणी बाहेर जाऊ नका, अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. दार खिडक्या उघड्या ठेऊन अन्न शिजवण्याचे क्षेत्र स्वयंपाकयर हवेशीर राहील हे बघा. अल्कोहोल म्हणजे दारू, चहा, कॉफी, शीतपेये टाळा त्यातून शरीरातले पाणी कमी होते. उच्च प्रथिनयुक्त मिठाचं प्रमाण जास्त असलेले किंवा तिखट तसेच तेलकट अन्न खाऊ नका. शिळंपार्क खाऊ नका. चारचाकी वाहन लावून ठेवताना त्यात लहान मुले किंवा प्राणी ठेऊ नका.

# पुन्हा राज्यातील ४ आयएएस अधिकाऱ्यांची बदली

## जी. श्रीकांत छत्रपती संभाजीनगरचे नवे विभागीय आयुक्त

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील आयएसएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडका सुरुच असून बुधवारीच ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर, गुरूवारी पुन्हा एकदा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, या चार अधिकाऱ्यांमध्ये जी. श्रीकांत यांचाही समावेश आहे.



जी श्रीकांत हे सध्या नवी मुंबई जल जीवन मिशन अभियानाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. मात्र, आता त्यांना छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तपदी नियुक्ती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ३ एप्रिल रोजीच त्यांची जल जीवन मिशन नवी मुंबई येथे मिशन संचालक पदावर बदली करण्यात आली होती. त्यामुळे, गेल्या १५ दिवसांत ही त्यांची दुसरी बदली आहे.

जी.श्रीकांत हे २००९ च्या युपीएससी बॅचचे आयएएस अधिकारी असून गेल्या १५ दिवसांपूर्वी ते छत्रपती संभाजीनगर मनपाचे आयुक्त होते. मात्र, ३ एप्रिल रोजी अभियान संचालक, जल जीवन मिशन, नवी मुंबई येथे त्यांची बदली करण्यात आली होती, ते तिथे कार्यरतही होते. आता, त्यांची विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग, येथे नियुक्ती करण्यात आली. तर, जितेंद्र पापळकर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग यांची जीएसटी, मुंबई सह आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पापळकर हे २०१० च्या युपीएससी बॅचचे आयएएस अधिकारी आहेत.

जी. श्रीकांत यांच्याजागी गंगाथरण डी. यांची मिशन डायरेक्टर, जल जीवन मिशन, नवी मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गंगाथरण हे २०१३ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. यासह, जगदीश मिनियार मुख्य प्रशासक (नवीन टाऊनशिप), सिडको, छत्रपती संभाजी नगर यांची महिला व बालक आयुक्त पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. मिनियार हे २०१५ च्या बॅचचे युपीएससी उत्तीर्ण अधिकारी आहेत.

दरम्यान, बुधवारीच पाच अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश निघाले होते, त्यानंतर आणखी चार अधिकाऱ्यांची बदली करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

# विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर

## स्थानिक स्वराज संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकांचाही मार्ग मोकळा

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आता राज्याच्या वरिष्ठ सभागृहातही विरोधकांची पिछेहाट होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. विधानपरिषदेच्या ९ रिक्त जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केला असून, येत्या १२ मे रोजी यासाठी मतदान होणार आहे. विधानसभेतील सध्याचे पक्षीय बलाबल पाहता, या निवड सत्ताधारी महायुतीचे वर्चस्व राहणार असून, महाविकास आघाडीला ९ पैकी केवळ एका जागेवर समाधान मानावे लागणार आहे.

या निवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होईल. तर, ३० एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. १२ मे रोजी सकाळी ९ ते ४ या वेळेत मतदान पार पडेल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होऊन निकाल स्पष्ट होईल. निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भाजपचे रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय केनेकर, संदीप जोशी आणि दादाराव केचे यांचा समावेश आहे. याशिवाय नीलम गोऱ्हे (शिवसेना), अमोल मिटकरी (राष्ट्रवादी), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी-शरद पवार गट), राजेश राठोड (काँग्रेस) आणि शिवसेना ठाकरे गट यांचीही मुदत संपत आहे. विधानसभेत महायुतीचे (भाजप १३२, शिवसेना ५७ आणि अजित पवार गट ४१) असे प्रचंड संख्याबळ आहे. त्यातच राहुरी आणि बारामती पोटनिवडणुकीनंतर महायुतीच्या खात्यात आणखी दोन आमदारांची भर पडणार असल्याने ९ पैकी ७ जागांवर महायुतीचा विजय सुकर मानला जात आहे.

महाविकास आघाडीकडे सध्या एकूण ४६ (शिवसेना ठाकरे गट २०, काँग्रेस १६ आणि शरद पवार गट १०) आमदार आहेत. एका जागेसाठी लागणारा कोटा पाहता मविआचा एक उमेदवार सहज निवडून येऊ शकतो. मात्र, दुसऱ्या जागेसाठी त्यांना किमान १० मतांची जुळवाजुळव करावी लागणार आहे. राज्यसभेच्या वेळी झालेल्या तडजोडीनुसार, यावेळी शरद पवार गटाला माघार घ्यावी लागण्याची शक्यता असून, ही एकमेव जागा शिवसेना ठाकरे गटाच्या पदरात पडू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# इस्लापूरच्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्याचा विहिरीत बुडून मृत्यू

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील इस्लापूर येथील संत फुलाजी बाबा अनुदानित आश्रम शाळेतील सातवीच्या एका विद्यार्थ्याचा विहिरीत बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि. १६ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली.



या घटनेमुळे इस्लापूर परिसरात शोककळा पसरली असून शाळा प्रशासनाच्या देखरेखीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मृत विद्यार्थ्याचे नाव सुरेश अंकुश वाळके (वय १४, रा. सावरी) असे आहे. तो आश्रम शाळेत सातवी इयत्तेत शिक्षण घेत होता. वाढत्या तापमानामुळे शिक्षण विभागाने सकाळच्या सत्रात शाळा सुरू ठेवून दुपारी सुट्टी देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गुरुवारी शाळा सुटल्यानंतर दुपारच्या वेळेत विद्यार्थ्यांवर योग्य देखरेख न ठेवल्याने शाळेतील विद्यार्थी दीपक दगडू वानोळे वर्ग आठवा, जय गजानन टारपे वर्ग नववा, नैतिक बालाजी टारपे वर्ग नववा, युवराज साईनाथ येलकेवाड वर्ग आठवा, करण देविदास डाके वर्ग आठवा, खंडू सुभाष अंबोरे वर्ग आठवा हे सर्व विद्यार्थी शाळेजवळील विहिरीत पोहण्यासाठी गेले होते. यावेळी सुरेश वाळके याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन किनवट उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांनी घटनास्थळी भेट देऊन सदरील घटनेची माहिती घेतली.

# आदित्य ठाकरेंवरील आरोपामुळे लोकसभेत गोंधळ

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशाच्या संसद सभागृहात गुरूवारी महिला आरक्षण लागू करण्याच्या घटनादुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरू असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी निवेदन करताना महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना दीर्घकाळ परिणाम भोगावे लागतील, असं म्हटलं. तर महाविकास आघाडीतील शिवसेना पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी महिला आरक्षणास आमचा विरोध नाही, तर मतदार संघ पुनर्रचना म्हणजे delimition या विषयाला आमचा विरोध असल्याचे म्हटले.

दरम्यान, संसदेत महिला आरक्षण आणि सुरक्षा विषयावर बोलताना खासदार अरविंद सावंत आणि भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यात तू तू मै मै झाल्याचं पाहायला मिळालं. दुबेंनी आदित्य ठाकरेंचं नाव घेतल्याने अरविंद सावंत चांगलेच संतापले होते.

नारी शक्ती विधेयकावर बोलताना अरविंद सावंत म्हणाले की, महिला आरक्षण, महिला आरक्षणाच्या गप्पा मारता, आधी महिला संरक्षणावर चर्चा करा. कुलदीप सेंगर कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे. ब्रिजभूषणसिंह हे महिलांचा सन्मान करणारे आहेत का? असा सवाल खासदार अरविंद सावंत यांनी संसदेत उपस्थित केला. भाजप नेते आणि मंत्री राहिलेल्या कुलदीप सेंगर यांच्यावर बलात्काराचा आरोप असून त्यांना अटकही झाली होती. तर ब्रिजभूषण सिंह यांच्यावरही महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप केले होते. त्यावरुन, अरविंद सावंत यांनी भाजपला डिवचलं. त्यानंतर, खासदार निशिकांत दुबेंनी आदित्य ठाकरेंचं नाव घेतलं, यावरून सभागृहात गोंधळ उडाला.

# पालकमंत्री अतुल सावे नांदेड दौऱ्यावर




**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे १७ व १८ एप्रिल रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वा. छत्रपती संभाजीनगर येथून माहूरगड शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सकाळी ९ वा. शासकीय विश्रामगृह माहूरगड येथे आगमन व राखीव. सकाळी ९.३० वा. परमपुज्य महंत दत्त **(पान ३ वर...)**


# अमरनाथ यात्रेला सुरुवात

**श्रीनगर (प्रतिनिधी)–** देशातील सर्वात कठीण आणि तितकीच श्रद्धास्थान असलेली अमरनाथ यात्रा सुरूवात झाली आली आहे. हिमालयातील ३,८८८ मीटर उंचीवर असलेल्या पवित्र गुहेतील नैसर्गिक बर्फाच्या शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. प्राप्त माहितीनुसार, यंदाची ही यात्रा १५ एप्रिल २०२६ पासून अधिकृतपणे सुरू झाली आहे.

श्री अमरनाथ तीर्थक्षेत्र मंडळामार्फत या यात्रेचे नियोजन केले जात असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमांची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे. यात्रेसाठी लागणारी



नोंदणी प्रक्रिया आता सुरू झाली असून भाविकांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने आपले नाव नोंदवता येणार आहे. दुर्गम भाग आणि हवामानातील बदल लक्षात घेता, भाविकांनी वेळेत नोंदणी करून प्रशासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.




# महिला आरक्षण लागू करण्यासाठी विशेष अधिवेशनाला सुरुवात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** महिला आरक्षण लागू करण्यासाठी गुरूवारपासून संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. हे अधिवेशन २ दिवस चालणार आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीतच महिला आरक्षण कायदा लागू करण्याच्या उद्देशाने आणलेल्या या विधेयकाचे अधिकृत नाव 'नारी शक्ती वंदन अधिनियम' असे आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्यासाठी हे विशेष अधिवेशन बोलविण्यात आलं आहे. यासाठी घटना दुरुस्ती करण्यात येणार असून, लोकसभेत सध्या ५४३ खासदार आहेत. ही संख्या ८५० पर्यंत वाढणार आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या जागा ४८ वरून ७२ पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.



संविधान (१३१वा दुरुस्ती) विधेयकाद्वारे अनुच्छेद ८१ मध्ये बदल करण्यात येणार आहे. तसेच लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित केली जाणार असून, संसदेद्वारे मान्य केलेल्या जनगणनेनुसारच प्रतिनिधित्व निश्चित होईल. सध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जागांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या शहरीकरण, स्थलांतर आणि राज्यांमधील लोकसंख्येतील असमतोल लक्षात घेऊन हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. विधेयकात अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि नागालँड यांसारख्या ईशान्य राज्यांमध्ये अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व कायम राखण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्रिपुरामध्येही सध्याचे प्रमाण जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

महिला आरक्षण विधेयक आणि लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरुन सध्या राजधानी दिल्लीचं वातावरण चांगलंच तापलंय. काँग्रेसच्यावतीनं काल विरोधी पक्षांची बैठक बोलावण्यात आली. महिला आरक्षण विधेयकाला विरोध नसून भाजपच्या कार्यपद्धतीला विरोध असल्याचं या बैठकीनंतर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी स्पष्ट केलं आहे. मतदारसंघ फेररचनेत लोकसभेच्या जागा ५४३ वरुन ८५० पर्यंत वाढवल्या जाणार आहेत. तर महिलांना लोकसभा आणि विधिमंडळात ३३ टक्के जागा आरक्षित ठेवणार आहेत. विरोधकांचा महिला आरक्षणाला पाठिंबा आहे पण, मतदार फेररचनेला विरोध असल्याचं मल्लिकार्जुन खरगेंनी स्पष्ट केलं आहे. या बैठकीसाठी पवारांच्या राष्ट्रवादीकडून सुप्रिया सुळे तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून संजय राऊत उपस्थित होते. उद्धव ठाकरेंनीही बैठकीला ऑनलाईन उपस्थिती लावली.

दरम्यान, हा प्रस्ताव नारी शक्ति वंदन अधिनियम लागू करण्यासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या अंतर्गत लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू होणार आहे. डिलिमिटेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव केल्या जातील. या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत १५ वर्षे ठेवण्यात येणार आहे. या विधेयकामुळे लोकसभेच्या संरचनेत मोठा बदल होणार आहे. सध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जागांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या शहरीकरण, स्थलांतर आणि राज्यांमधील लोकसंख्येतील असमतोल लक्षात घेऊन हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

# युद्ध पुन्हा सुरू होणार? अमेरिकेची इराणला मोठी धमकी, जगाची चिंता वाढली

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)–** अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये ३९ दिवस भीषण युद्ध सुरू होतं. या युद्धामध्ये इराणचं मोठं नुकसान झालं आहे. अमेरिका आणि इस्त्रायलकडून करण्यात आलेल्या हल्ल्यांमध्ये इराण पूर्णपणे उद्ध्वस्त झालं आहे. मात्र तरी देखील इराणने युद्धातून माघार घेतली नव्हती, इराणकडून मध्य पूर्वेत असलेल्या अमेरिकेच्या अनेक सैन्य तळांना लक्ष्य करण्यात आले तसेच इस्त्रायलवर देखील मिसाईल हल्ले करण्यात आले. या युद्धात अमेरिका आणि इस्त्रायलचं देखील मोठं नुकासन झालं. शेवटी या युद्धात पाकिस्तानने मध्यस्थी केली. पाकिस्तानच्या मध्यस्थीने अमेरिका आणि इराण दोन्ही देशांकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. दोन आठवड्यांसाठी युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. याचदरम्यान पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये दोन्ही देशांमध्ये शांतीवार्ता होईल असं ठरलं होतं.

ठरल्याप्रमाणे पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये दोन्ही देशांमध्ये युद्धविरामावर वाटाघाटी झाल्या, मात्र ही चर्चा यशस्वी होऊ शकली नाही. दरम्यान आता पुन्हा एकदा अमेरिका आणि इराणमध्ये युद्धविराम ाच्या चर्चेची दुसरी फेरी होण्याची शक्यता आहे. मात्र ही चर्चा सुरू होण्यापूर्वीच अमेरिकेनं इराणला मोठी धमकी दिली आहे. जर तुम्ही शांतीवार्ताचा प्रस्ताव फेटाळला तर आम्ही पुन्हा तुमच्यासोबत युद्ध करू असं अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी म्हटलं आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# नेपाळ : नवी विटी नवं राज्य, की...

कोणत्याही देशाची प्रगती होण्यासाठी आणि तेथील जनतेला शांत जीवन जगता यावं यासाठी शेजारी राष्ट्रं चांगले असणे गरजेचे आहे, परंतु दुर्दैवाने आपल्या देशाला असलेले सगळेच शेजारी सख्खे शत्रू आहेत, पण नेपाळ त्यातील थोडासा मवाळ म्हणता येईल. नेपाळमधील सत्तांतर हा केवळ राजकीय बदल नसून, त्या देशाच्या आणि त्यासोबत भारतासोबतच्या नात्याच्या भविष्याचा नवा अध्याय ठरू शकतो. नवे पंतप्रधान बालेन शाह यांच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या धोरणात्मक बदलांनी केवळ नेपाळमध्येच नव्हे, तर शेजारी देशांमध्येही आशेचा एक नवा किरण निर्माण केला आहे. या घडामोडींचा विचार करताना भारत-नेपाळ संबंधांचा व्यापक संदर्भ लक्षात घेणे अत्यावश्यक ठरते. नेपाळमध्ये सत्ता बहुतेक वेळा औपचारिकतेत अडकलेली दिसत होती. परंतु बालेन शाह यांच्या सत्ताग्रहणानंतर त्या पद्धतीत काही प्रमाणात बदल झाल्याचे जाणवते. त्यांच्या कारभाराच्या सुरुवातीलाच घेतलेल्या ठोस निर्णयांनी प्रशासनात वेग आणि स्पष्टता आणण्याचा प्रयत्न दिसून येतो. व्हीआयपी संस्कृतीला आळा घालणे, माजी मंत्र्यांच्या संपत्तीची चौकशी सुरू करणे, तसेच शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याचा निर्णय घेणे, या उपाययोजना केवळ लोकप्रिय ठरल्या नाहीत, तर पारदर्शकतेचा संदेशही देऊन गेल्या. विशेषतः खासगी शाळांवर बंदी घालून सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना एकाच सरकारी शिक्षण व्यवस्थेत आणण्याचा प्रयत्न हा सामाजिक समतेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो. या निर्णयामुळे समाजातील आर्थिक दरी कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते. शासनातील उत्तरदायित्व आणि भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्नही या धोरणांमधून स्पष्टपणे दिसून येतो. अशा प्रकारचे बदल आपल्या देशामध्ये होतील याची कल्पनाही करणे सध्या तरी शक्य नाही, कारण प्रत्येक राजकीय पक्ष आणि त्यातील प्रत्येक नेता हा कुठंनूकुठं गुंतलेला आहे. जेव्हा तो स्वतः त्यातून स्वतःची सोडवणूक करू शकत नसेल तर तो जनतेची सोडवणूक काय करणार? शाह यांच्या १०० मुद्द्यांच्या कार्यक्रमाने प्रशासनाला एक निश्चित दिशा दिली आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून शासनाच्या विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न होत आहे. मंत्रालयांची संख्या कमी करून प्रशासन अधिक कार्यक्षम बनवण्याचा निर्णय, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सेवा सुलभ करण्याचा प्रयत्न, तसेच आर्थिक व्यवहारांवर अधिक नियंत्रण ठेवण्याची भूमिका, हे सर्व बदल नेपाळमध्ये सुशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरू शकतात. डिजिटल प्रशासनाच्या संकल्पनेमुळे नागरिकांना घरबसल्या सेवा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कागदोपत्री कामकाज कमी करून पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न हा आधुनिक प्रशासनाचा भाग आहे. तसेच बेकायदेशीर सट्टेबाजी ॲप्सवर बंदी घालण्यासारख्या निर्णयांनी शासनाची कठोर भूमिका स्पष्ट होते. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना पुन्हा गती देण्याचे प्रयत्नही आशादायक आहेत. मात्र, या सर्व सकारात्मक घडामोडींमध्ये एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही, तो म्हणजे या सुधारणा दीर्घकाळ टिकवण्याचे आव्हान. नेपाळची प्रशासकीय यंत्रणा ही अनेक दशकांपासून अस्थिरावलेल्या पद्धतींवर आधारित आहे. त्यामुळे नव्या धोरणांना प्रत्यक्षात उतरवताना अडथळे येणे स्वाभाविक आहे. बदलाची गती टिकवून ठेवणे आणि प्रणालीमध्ये मूळापासून परिवर्तन घडवून आणणे ही खरी कसोटी ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर भारत-नेपाळ संबंधांचे महत्त्व अधोरेखित होते. भारत आणि नेपाळ हे केवळ शेजारी देश नाहीत, तर ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी घट्ट बांधलेले राष्ट्र आहेत. खुली सीमा, धार्मिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण, तसेच व्यापारातील परस्परावलंबन या गोष्टींमुळे दोन्ही देशांचे संबंध विशेष स्वरूपाचे आहेत. नेपाळमध्ये स्थिर आणि पारदर्शक शासनव्यवस्था निर्माण झाली, तर त्याचा सकारात्मक परिणाम भारतावरही होणार आहे. सुरक्षित आणि स्थिर नेपाळ हा भारताच्या सुरक्षेसाठीही महत्त्वाचा घटक आहे. त्याचप्रमाणे आर्थिक सहकार्य, पायाभूत सुविधा विकास, ऊर्जा क्षेत्रातील भागीदारी यांसारख्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांना मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. भारताने नेपाळच्या अंतर्गत घडामोडींमध्ये हस्तक्षेप न करता, परस्पर सन्मान आणि सहकार्याच्या तत्त्वावर संबंध अधिक दृढ करण्याची गरज आहे. नेपाळमधील सुधारणा प्रक्रियेला सकारात्मक पाठबळ देणे, तसेच द्विपक्षीय संवाद अधिक प्रभावी बनवणे हे दोन्ही देशांच्या हिताचे ठरेल. कारण बालेन शाह यांच्या नेतृत्वाखाली नेपाळमध्ये सुरू झालेली परिवर्तनाची प्रक्रिया ही केवळ त्या देशापुरती मर्यादित नाही. तिचा प्रभाव संपूर्ण दक्षिण आशियावर पडू शकतो. मात्र, या परिवर्तनाची खरी परीक्षा अजून शिल्लक आहे. घोषणांपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतचा प्रवास हा कठीण असतो. नेपाळने जर या सुधारणा यशस्वीपणे राबवल्या, तर तो देश प्रगतीच्या नव्या उंचीवर पोहोचू शकतो. आणि या प्रवासात भारतासोबतचे मजबूत, विश्वासार्ह आणि सहकार्यपूर्ण संबंध हेच त्याचे सर्वात मोठे बळ ठरतील.

# नारी शक्ती वंदन : लोकशाहीच्या नव्या पर्वाची सुरुवात




भारताच्या लोकशाही प्रवासातील काही क्षण केवळ कायदेशीर बदल नसतात, तर ते एका नव्या युगाची नांदी ठरतात. नवीन संसद भवनात पहिले विधेयक म्हणून सादर झालेला 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा असाच एक आश्वासक टप्पा आहे. २८ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीने या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. आजपासून (१६ एप्रिल २०२६) सुरू होणारे संसदेचे तीन दिवसीय विशेष सत्र या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. हे केवळ धोरणात्मक पाऊल नसून, निम्म्या लोकसंख्येला 'धोरणकर्ते' म्हणून मुख्य प्रवाहात आणणारे 'संविधानिक अधिष्ठान' आहे.

महिला आरक्षणाचा प्रवास जवळपास तीन दशकांचा आहे. १९९६ मध्ये सुरू झालेला हा संघर्ष आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. महिलांच्या हाती 'कायदेशीर सत्ता' देण्याचे महत्त्वपूर्ण काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पूर्ण करत आहे. हा कायदा केवळ ३३% आरक्षणापुरता मर्यादित नसून, तो सत्तेच्या रचनेत महिलांना 'प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व' देतो.

**विशेष सत्रातील संशोधने आणि पुढील दिशा**

या कायद्याच्या पूर्ण अंमल-बजावणीसाठी जनगणना आणि मतदारसंघांची पुनर्रचना (परिसीमन) आवश्यक आहे. १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान चालणाऱ्या विशेष सत्रात यावर सखोल चर्चा होऊन महत्त्वाची संशोधने मांडली जातील. यामध्ये २०११ च्या जनगणनेला आधार मानून परिसीमन करण्याची आणि लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याची शक्यता आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी या आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, असा सरकारचा प्रयत्न आहे. या प्रक्रियेनंतर परिसीमन आयोगाची नियुक्ती आणि आरक्षित जागांचे चक्राकार पद्धतीने वाटप होईल.

**प्रतिनिधित्वाचा नवा समतोल**

सध्या लोकसभेतील महिला खासदारांचे प्रमाण एकूण संख्येच्या अवघे १४% आहे. नवीन तरतुदींमुळे ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल. यामुळे कायदेमंडळातील चर्चेचा दर्जा आणि संवेदनशीलता वृद्धिंगत होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लाखो महिलांच्या अनुभवाच्या विस्तारासाठीचा हा पुढचा टप्पा आहे. आता महिला केवळ 'सरपंच-पती'च्या सावलीत न राहता, पंचायतीपासून थेट संसदेपर्यंत पोहोचतील. हा बदल त्यांना प्रतिकात्मक सत्तेकडून 'वास्तविक सत्ते'कडे घेऊन जाईल.

**सर्वसमावेशक न्याय आणि नेतृत्त्व विकास**

अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील महिलांसाठी यात अंतर्गत आरक्षणाची तरतूद आहे. यामुळे समाजातील शेवटच्या स्तरातील महिलेला निर्णय प्रक्रियेत स्थान मिळेल. मतदारसंघांच्या चक्राकार (रोटेशन) पद्धतीमुळे राजकीय मक्तेदारी मोडीत निघेल आणि विविध भौगोलिक क्षेत्रांतून नवीन महिला नेतृत्त्व पुढे येईल.

**पायाभूत सुविधा आणि आर्थिक सक्षमीकरण**

राजकीय आरक्षण हे सुरक्षित वातावरणातच यशस्वी होऊ शकते. जेव्हा एखादी स्त्री पाण्यासाठी होणारी पायपीट आणि चुलीच्या धुरापासून मुक्त होते, तेव्हाच तिच्याकडे समाजकार्यासाठी 'वेळ' उरतो. गेल्या दशकातील उज्ज्वला योजना, स्वच्छ भारत अभियान आणि जल जीवन मिशन यांसारख्या उपक्रमांनी महिलांना तो सन्मान दिला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत ६९% घरांची मालकी महिलांकडे असणे, हे त्यांच्या सामाजिक सक्षमीकरणाचे मोठे उदाहरण आहे.

आर्थिकदृष्ट्या सक्षम स्त्रीच राष्ट्राचा विकासदर वाढवू शकते. 'मुद्रा' योजनेतील ७०% कर्जदार महिला असणे किंवा 'लखपती दीदी' आणि 'नमो ड्रोन दीदी' यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती होत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते, महिलांचा सहभाग वाढल्यास भारताच्या GDP मध्ये २७% वाढ होऊ शकते. कुशल महिला कार्यबळात सामील झाल्या तर भारताचा विकासदर वार्षिक ९ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो.

**'विकसित भारता'चा पाया**

नारी शक्ती वंदन अधिनियम हा २०४७ पर्यंतच्या 'विकसित भारता'चा जाहीरनामा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे, जोपर्यंत देशाच्या विकासात महिलांचा समसमान वाटा झाल्यास खऱ्या अर्थाने विकसित होऊ.

तीन तलाक बंदी, 'झीरो-एफआयआर' आणि जलदगती न्यायालये यांमुळे महिलांना मिळालेले सुरक्षिततेचे कवच त्यांना नेतृत्वासाठी आत्मविश्वास देते.

आता 'ती' केवळ गृहिणी राहिलेली नाही, तर ती राष्ट्रनिर्माती आहे. जेव्हा स्त्री स्वतःच्या क्षमतेने सत्तेच्या केंद्रस्थानी येते, तेव्हा संपूर्ण राष्ट्राच्या भविष्याला नवी आणि आश्वासक दिशा मिळते.

-डॉ. श्याम टरके
सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

# मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घाला



सोशल मीडिया हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आजचे युगच सोशल मीडियाचे युग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण आज सोशल मीडिया ही जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण सोशल मीडियावर सक्रिय आहेत. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे आणि या स्मार्ट फोनमध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, शेअर चाट, स्नॅप चाट, यु ट्यूब अशा अनेक सोशल मीडियावर साईट आहेत. या सोशल मीडिया साईटवर सतत सक्रिय राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवण्यासाठी जो तो धडपडत असतो. विशेषतः किशोवयीन आणि तरुण मुलांमध्ये या सोशल मीडिया साईटची भलतीच भुरळ आहे.

आजची युवा पिढी आपला सर्वाधिक वेळ सोशल मीडियावरच व्यतीत करते. एका सर्व्हेक्षणानुसार आपल्या देशातील मुले दररोज सरासरी पाच तास सोशल मीडियावर व्यतीत करतात. याचाच अर्थ आपली मुले सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. ही मुले दिवसभर उपाशी राहू शकतील, पण सोशल मीडियापासून दूर राहू शकणार नाही. विशेष म्हणजे केवळ तरुण मुलेच नाही तर शाळकरी मुले देखील सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. तज्ज्ञांनी अनेक वेळा इशारा देऊनही त्याचा वापर कमी झालेला नाही उलट वाढतच चालला आहे.

सोशल मीडियामुळे तर त्याच्या वापर उच्चांकी पातळीवर पोहचला आहे. त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत. सोशल मीडियाचा अती वापरामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. सोशल मीडियामुळे मुले हिंसक बनू लागले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील तणाव वाढला आहे. मुलांना डोळ्यांच्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत अनेक मुलांना लहान वयातच चष्मा लागला आहे. सोशल मीडियामुळे मुले मैदानी खेळ विसरले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील संवाद हरपला आहे. मुले एकलकोंडी बनली आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे सोशल मीडियामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला आहे. मुलांची एकाग्रता भंग झाली आहे. मुले चीडचिडी बनली आहेत म्हणून किमान शाळकरी मुलांना तरी सोशल मीडियापासून दूर ठेवावे असे तज्ज्ञ सांगत आहेत. त्यामुळे अनेक शाळांनी मुलांना शाळेत मोबाईल वापरण्यास बंदी घातली आहे. मात्र शाळा सुटल्यावर मुले सोशल मीडियाचा वापर करतातच म्हणून मुलांच्या सोशल मीडिया वापरावर कायद्यानेच बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली आहे.

भारत सरकारने अजून तरी शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी आली नसली तरी कर्नाटक सरकारने मात्र या संदर्भात सकारात्मक पाऊल टाकत १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला आहे. लहान मुले सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नयेत, तसेच लहान मुलांची ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाईम पासून मुलांना वाचवण्यासाठी कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे बंदीचा प्रस्ताव आणणारं कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे. कर्नाटक सरकारचे याबाबत जितके कौतुक करावे तितके कमी आहे. कर्नाटक सरकारचा हा अनुकरणीय आहे.

कर्नाटक सरकारच्या या निर्णयाचे आंध्रप्रदेश आणि गोवा सरकारनेही अनुकरण करण्याचे ठरवले असून हे राज्यही लवकरच लहान मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घालणार आहेत. आपल्या देशात लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यासंदर्भात आता पावले उचलली जात आहेत मात्र जगातील अनेक देशात याआधीच लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली गेली आहे. दोन वर्षापूर्वी अमेरिकेतील फ्लोरिडा प्रांताने शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली. त्यांनी तसा कायदाच केला आहे. फ्लोरिडा प्रांताचे गव्हर्नर रॉन डी सेंटीस यांनी तसा कायदाच मंजूर करून घेतला.

ऑस्ट्रेलियातही १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडियाचा वापर करण्यास बंदी घातली आहे. आता भारतातही त्या संदर्भात पावले उचलली जात आहे ही सकारात्मक बाब आहे मात्र प्रत्येक राज्यसरकारने आपल्या राज्यपुरता असा निर्णय घेण्याऐवजी जर केंद्र सरकारनेच संसदेत तसा कायदा केला तर तो संपूर्ण देशात एकाच वेळी ही बंदी लागू होईल. त्यामुळे केंद्र सरकारलाच विनंती आहे की त्यांनी संसदेत तसा कायदा करावा अर्थात कायद्यानेच मुलांचे सोशल मीडियाचे व्यसन सुटेल असे नाही तर कायद्याला प्रबोधनाचीही जोड द्यावी लागेल. कायद्यासोबत मुलांचे प्रबोधन केले, मुलांना सोशल मिडियाचे दुष्परिणाम समजावून सांगितले त्यासाठी शाळेत चर्चा सत्र आयोजित केली तर मुलांचे सोशल मीडियाचे व्यसन सुटण्यास नक्कीच मदत होईल. कायद्याने असोत की प्रबोधनाने मुलांचे मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटणे महत्वाचे आहे.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
९९२२५४६२९५

# उष्णलहरी आणि बचावात्मक खबरदारी




जगातील दुसरे उष्ण शहर म्हणून, विदर्भातील अकोला शहराची नोंद 'एल डोरंडो' या संकेतस्थळावर करण्यात आल्याचे वृत्त अलीकडेच वाचण्यात आले. याशिवाय यंदाच्या उन्हाळ्यातला पहिला उष्माघाताचा बळी अकोला शहरात झाल्याची घटना घडली. विदर्भातील काही जिल्ह्यांचे तापमान एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात ४४ ओ अंशावर पोहोचलेले आहे. भारतीय हवामान विभागाने विदर्भात उष्ण लहरीचा इशारा दिला असून राज्यातील २३ जिल्ह्यांतील तापमानाने चाळीशी पार केलेली दिसते.

भारतीय हवामान विभाग आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निकषानुसार, मैदानी भागात ४० अंश सेल्सिअस, डोंगराळ भागात ३० अंश सेल्सिअस व समुद्रकिनारी भागात ३७ अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमान असल्यास उष्ण लहरी प्रवणक्षेत्र मानले गेले आहे. तर कोणत्याही ठिकाणचे कमाल तापमान सलग दोन दिवस ४५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास त्याला उष्ण लहरी स्थिती मानले आहे. सध्या वर्तमान स्थितीत विदर्भातील अमरावती, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात बघायला मिळत आहे.

एकंदरीत उष्णलहरीचा परिणाम केवळ मानवांवरच होत नसून, संपूर्ण पर्यावरण संस्थेवर होत असतो. या उष्ण लहरींचा फटका प्रामुख्याने प्रौढ व बालकांवर अधिक परिणामकारक ठरत असतो. या काळात उष्णतेमुळे होणाऱ्या थकव्यांचे नैसर्गिकरित्या व्यवस्थापन करणे गरजेचे असते. आधुनिक काळ कितीही प्रगत असला तरी, उष्णतारोधक उपकरणे ही कुचकामी ठरतात. उन्हाळ्यात प्रामुख्याने उष्णतेमुळे होणारा थकवा आणि शरीर हायड्रेट राहणे आवश्यक ठरते. कुठल्याही शारीरिक हालचालींपूर्वी, दरम्यान आणि नंतर भरपूर द्रव्य पदार्थ घेणे आवश्यक असते. सामान्यत: सकाळी अकरा ते दुपारी चार च्या दरम्यान प्रत्यक्ष उन्हात कामे करणे टाळणे आवश्यक ठरते. शरीराला अनुकुलता देण्यासाठी योग्य हलके, शरीर सैल, थंड ठेवण्यास मदत करणारे वस्त्र प्रदान करणे गरजेचे असते. शक्य होईल तेवढे थंड वातावरणात अथवा प्रत्यक्ष उन्हाचा संपर्क टाळणे आवश्यक असते.

दरम्यान शारीरिक स्वच्छता ही तेवढीच महत्त्वाची आहे. त्यामुळे संसर्ग टाळण्यास मदत मिळते. हवामान बदलामुळे दैनंदिन आहारात बदल आवश्यक आहे, आणि महत्त्वाचे असते. उन्हाळी फळे, भाज्या आणि इलेक्ट्रोलाइट्सने समृद्ध संतुलित आहार घेतल्यास हायड्रेशन (शरीरातील पाण्याची पातळी) राखण्यास मदत मिळते. उष्णतेमुळे येणारा थकवा आणि उष्माघात हे भिन्न असून, उष्माघात एक वैद्यकीय आणीबाणी आहे. यासाठी वैद्यकीय सल्ला व उपचार घेणे अतिशय गरजेचे असते. मानवी शरीराचे तापमान १०४ फॅरेनाईट किंवा ४०अंश सेल्सिअसपेक्षा अधिक होणे, तीव्र डोकेदुखी, अधिक श्वास आणि हृदयाचे गतीची तीव्रता, चेतना कमी होऊन बेशुद्ध अवस्थेत जाण्याची लक्षणे असल्यास, तातडीने रुग्णाला इस्पितळात भरती करणे गरजेचे होते.

आगामी काळात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत असून, उष्माघाताच्या बचावार्थ आरोग्य विभागाने लोकजागृती करण्यास सुरुवात केली असली, तरी ही लोकजागृती ग्रामीण भागात पोहोचायला हवी. करिता उष्माघाताविषयी लोकजागृती सूक्ष्म नियोजन व संभाव्य परिस्थितींचे अवलोकन करून उष्माघाताच्या बचावार्थ वैद्यकीय उपचारांची सुसज्जता वाढविणेही गरजेचे ठरते. तद्वतच स्वेच्छेने, आस्थापने, औद्योगिक वसाहतींमध्ये काम करणारे कामगार, तर उघड्यांवर बांधकाम करणारे कामगार, ग्रामीण शेतकरी, शेतमजूर, गृहिणी यांच्या कामाचे नियोजन तीव्र उष्ण लहरीच्या काळात करणे गरजेचे ठरते.ज्यामुळे संभव्य: आपत्ती पासून संरक्षण होईल.

-शशिकांत म. तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

# घेऊनिया हात रिता...

संकटे येतात आणि जातात. समज-गैरसमज होत राहतात. माणसे भेटतात पुन्हा दुरावतात. संकटांत खंबीर असणे महत्त्वाचे. अचानक येणाऱ्या संकटाने, दुःखाने प्रत्येक माणूसच सुरुवातीला थोडासा चळतो, ढळतो. हे अगदी सहाजिकच आहे. निसर्गनियम आहे. अशा परिस्थितीत खऱ्याअर्थाने त्याला मानसिक आधाराची गरज असते. भावनिक खंबीरतेची आवश्यकता असते. यासाठी माणूस आपुलकीच्या चार शब्दांची वाट पाहत असतो. खंबीर बनवणाऱ्या माणसाचा शोध घेत असतो. मोकळे होण्यासाठी मनमोकळे बोलण्याची गरज असते. त्यासाठी कुणाच्यातरी हृदयात स्वतःची जागा हवी असते.

घाबरू नको संकटाना
म्हणुन कायम धीर देणारं
कोणीतरी असावं लागत
खांद्यावर हात ठेवून लढ म्हणणारं

मानसिक, भावनिक बळ प्रेमाच्या चार शब्दांनी मिळते. आपुलकीचे चार शब्द खूप मोठी प्रेरणा देतात, प्रोत्साहन देतात. संकटाला सामना करण्यासाठी 'उभं' करतात. अडचणींना सामोरे जाण्याचे धैर्य देतात. दुःख पचवण्याची शक्ती देतात. आपले आधारस्तंभ कोण असतील हे आपले अंतर्मन ठरवत असते. आपले आदर्श आणि जवळचे हेच आधारस्तंभ असतात. ही कविता सगळ्यांनाच आठवत असेल

खिशाकडे हात जाताच
हसत हसत उठला
पैसे नको सर मला
जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार सारा
तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवूनी
फक्त लढ म्हणा...

आपल्या आदर्श असणाऱ्या, भावनिक आधार देणाऱ्या गुरुजीने पाठीवर हात ठेवून लढ म्हटल्यावर कोणत्याही तुफानाला सामोरे जाण्याची ताकद आमच्यामध्ये येते. ती याच आपुलकीच्या शब्दाने. कौतुक करणाऱ्या, धैर्य देणाऱ्या दोन वाक्यांनी माणूस उभा राहतो. माणसे आयुष्यभर आधार शोधत राहतात. यशस्वी जीवन जगण्यासाठी मानसिक ताकद देणारे चार शब्द हवेच असतात.

आजच्या काळात हेच आपुलकीचे चार शब्द फार महत्त्वाचे आहेत. संकट आपल्यापर्यंत येईस्तोवर आपण खंबीर असतो. एकदा का संकट आले; की एका क्षणात कोलमडून पडतो. चांगली चांगली खंबीर माणसे डगमगतात, धडपडतात, कोसळतात. वेळ आल्यावर प्रत्येकालाच भीती वाटते. माणसे जेवढी आलेल्या संकटाने खचत नाहीत. त्यापेक्षा जास्त त्याच्या भीतीने गर्भगळीत होत असतात. अनेकांना या ताणतणावांचे समायोजन करता येत नाही. अनेक जण याचे बळी होत असतात. खरी गरज आहे भावनिक, मानसिक भक्कमपणाची. संकटाला तोंड देणाऱ्या खंबीर मनाची, भरभक्कम हृदयाची!

कोणत्याच कारणामुळे कुणाचेही उणेदुणे काढू नका. कुणा सोबत वैर भावना ठेवू नका. कुणाचा हेवा करु नका. कुणाचा द्वेष करू नका. असूया बाळगू नका. याउलट जेवढा लावता येईल तेवढा जीव लावा. एकमेकांचा जेवढा आधार बनता येईल तेवढा बना. एकमेकांशी प्रेमाने, आपुलकीने वागा. गर्व, अहंकार काढून टाका. शेवटी किती दिवसाची सोबत आहे.... हे कुणालाच सांगता येत नाही, तसेच कोणती वेळ कशी येईल...? कोणावर येईल...? कधी येईल...? हे ही सांगता येत नाही. आत्ताच सावध व्हा..

आत्ताच वेळ आहे एकमेकांना समजून घेण्याची. परस्परांचा आधार होण्याचे. काही समज, गैरसमज असतील तर ते दूर करायचे आहेत. मनातून स्वच्छ, नितळ, निर्मळ व्हायचे आहे. नाविण्यासाठी, चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी, चांगले बोलण्यासाठी, चांगले बघण्यासाठी मनातला अहंकार गर्व कमी करायचा आहे. दुसऱ्याची विनाकारण टिंगल-टवाळी निंदानालस्ती पूर्णतः बंद करायची आहे. आपल्या तोंडातून निघणारा प्रत्येक शब्द चांगलाच असला पाहिजे.. यासाठी मनोमन प्रयत्न करायचे आहेत. येताना रिकाम्या हातांनी येतो; जाताना रिकाम्या हाताने जातो. मधल्या काळात आयुष्यभर अनेकांची मने जिंकायची आहेत. अनेकांच्या हृदयात जिव्हाळ्याचे, आपुलकीचे अढळ स्थान निर्माण करायचे आहे. आयुष्यात काय कमावले...? यापेक्षा किती माणसे जमवले...? याला फार महत्व आहे. हे समजून घेणे गरजेचे आहे.

-मयूर मधुकरराव जोशी
विठ्ठल-रुक्मिणी नगर,
जिंतूर, जि. परभणी.
मो. ९७६७७३३५६०

# आंतरराष्ट्रीय योग दिनाची जोरदार तयारी सुरू

## ▶ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची राहणार प्रमुख उपस्थिती
## ▶ नित्ययोग सेवा समितीचा उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील नित्ययोग सेवा समितीच्या वतीने येत्या २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून पाच दिवसीय योग शिबिराची जोरदार तयारी पूर्णत्वास येत आहे. २१ जूनच्या मुख्य कार्यक्रमासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



नित्य योग सेवा समिती गेल्या तीन वर्षांपासून नांदेड येथे एकूण २० मोफत नित्य योगा शाखांच्या अंतर्गत योगाचे कार्य करत आहे. येत्या १० जूनपर्यंत शहरात ५१ योग शाखा उघडण्याचा संकल्प योगाचार्य सीताराम सोनटक्के गुरुजी यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर किमान ५० हजार लोकांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याच्या उद्देशाने नित्ययोग सेवा समितीचे सर्व पदाधिकारी, शेकडो योग शिक्षक, योगशिक्षिका व योग साधक हे अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे नियोजन व या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती राहण्याबाबत वरिष्ठ पत्रकार तथा दै. गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील यांची विशेष भेट योगाचार्य सीताराम गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली नित्य योग सेवा समितीने दै. गोदातीर समाचार कार्यालयात घेतली. यावेळी आंतरराष्ट्रीय योग दिना संदर्भात सविस्तर चर्चा करून नित्ययोग सेवा समितीचे निस्वार्थ संकल्प घोणसे पाटील यांच्यासमोर मांडण्यात आले. समितीचे प्रवक्ते किशन घोलप यांनी नित्ययोग सेवा समितीच्या संपूर्ण कार्याचा आढावा थोडक्यामध्ये मांडला.

संपादक केशव घोणसे पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संपन्न होणाऱ्या योग शिबिरास संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी केशव घोणसे पाटील यांना शुभेच्छा देत नित्य योग सेवा समितीचे अध्यक्ष योगाचार्य सीताराम सोनटक्के गुरुजी यांनी त्यांचा सत्कार केला. सोबत समितीचे मुख्य कार्यवाहक किशन घोलप, आशुतोष घोणसे पाटील, दीपक पुयड, प्रल्हाद आयनेले, योगशिक्षक बजरंग घुगे, प्रसिद्धी प्रमुख मकरंद पांगरकर, बाळकृष्ण पसलवाड, माजी विस्तार अधिकारी गोविंद मांजरमकर, महेश सोमणवार आदींची उपस्थिती होती.

# देगलूरच्या जुन्या बसस्थानकाचे संथ गतीचे बांधकाम प्रवाशांच्या मुळावर

## नागरिकांना होतोय प्रचंड मन:स्ताप

**देगलूर (प्रतिनिधी)–** येथील जुन्या बसस्थानकाचे बांधकाम अत्यंत संथ गतीने चालू असल्याने प्रवाशांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. काही वर्षांपूर्वी जुने बसस्थानक पाडून त्या ठिकाणी लोखंडी अँगलचे टेकू देऊन टिनशेड उभे केले आहेत. स्थानकात बसण्यासाठी सोयीची आसन व्यवस्था नाही. जमिनीवर फरशी अंथरलेली तुटक्या फुटक्या अवस्थेत आहे. स्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले असून, मुके प्राणी, जनावरे, वराहचा वावर पहावयास मिळतो. परिणामी प्रवाशांना दुर्गंधीमुळे नाक मुठीत धरून नाईलाजाने बसची प्रतीक्षा करीत बसावे लागते. या प्रकारामुळे प्रवासी त्रस्त झाले आहेत.

तसेच बसस्थानकात प्रवाशांना पिण्याचे पाणी नाही, महामंडळाच्या कृपेने प्रवाशांना विकतचे पाणी घेऊन प्यावे लागते. बाळ व माताच्या सोयीसाठी स्तनपानाकरिता हिरकणी कक्ष फक्त देखाव्यासाठी ठेवलेले आहे, कारण ती सदा सर्वदा बंद अवस्थेत असते. स्थानकाच्या एका कोपऱ्यात शौचालय व मुतारीची सोय असून, त्याची अवस्था अत्यंत बकाल व घाणेरडी अशी आहे. स्थानकात अनधिकृत दुचाकी, चार चाकी पार्किंग केलेल्या आढळतात. ऑटोरिक्षावाले स्थानकात येऊन प्रवाशांची चढउतार करतात आणि स्थानक नियंत्रक बघ्याची भूमिका घेऊन शांत बसतात. सबकुछ मिली भगत! स्थानकासमोर बसेस ये-जा करण्यासाठी मैदानाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर मुरूम टाकून मैदान दुरुस्त केल्याचा आव महामंडळ आणते. पावसाळ्यात मैदानात चिखल व पाण्याचे डबके साचलेले असतात. परिणामी प्रवाशांना बसमध्ये चढ-उतार करताना नाकीनवू येते. वृद्ध, महिला व दिव्यांग यांना कमालीचा त्रास होतो. आगार प्रमुखांच्या नियोजनशून्य कारभारामुळे नांदेड शहर व लांब पल्ल्याच्या बसेस नेहमी विलंबाने ये-जा करतात. अनेक वेळा प्रवासी तक्रार करूनही आगाराच्या कारभारामध्ये सुधारणा होत नाही याचा प्रचंड मनस्ताप प्रवाशांना सतत होत आहे. याचे काही देणे-घेणे ना प्रशासनाला आहे, की राजकीय नेत्यांना !

रस्ता तिथे एसटी, असे घोषित करून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची पहिली बस १ जून १९४८ रोजी पुणे-अहमदनगर या मार्गावर धावली. नागरिकांना एक चांगल्या प्रकारे दळणवळणाच्या साधनाद्वारे सुरक्षित व सुखकर प्रवास एसटी महामंडळाच्याद्वारे घडावा या हेतूने राज्य शासनाच्या उदात्त हेतूने नागरिकांच्या प्रवाशांच्या सुखद प्रवासासाठी, स्वच्छ बसस्थानक, चांगल्या अवस्थेतील बसेस, प्रवाशांना प्रवासादरम्यान चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र शासन चांगले निर्णय घेत आले आहेत, परंतु प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे व राजकीय नेत्यांच्या दुर्लक्षामुळे निर्णय होऊन आणि निधी येऊनसुद्धा अनेक कामे वर्षानुवर्ष भिजत पडलेले असतात त्यांचे एक जिवंत उदाहरण म्हणजे देगलूरच्या मुख्य शहरातील जुन्या बसस्थानकाच्या नूतन इमारतीच्या बांधकामाचे होय.

कित्येक वर्षांपूर्वी जुन्या बसस्थानकाच्या बांधकामाचे भूमिपूजन होऊनसुद्धा अद्याप सदरील बांधकाम पूर्णत्वास गेले नसून अत्यंत संथ गतीने सदरील बसस्थानकाचे बांधकाम चालू आहे, ही गती अशीच संथ राहणार की बांधकाम पूर्ण होण्यास अजून किती वर्षे लागणार याची चर्चा प्रवाशात सध्या चालू आहे.

# गॅस वितरकांकडून घरपोच गॅस डिलिव्हरी सेवा बंद; नागरिकांचे हाल



**देगलूर (प्रतिनिधी)–** अमेरिका -इजरायल -इराण यांच्यात चिघळत चाललेल्या युद्धामुळे सगळीकडे पेट्रोल, डिझेल व एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. शासन स्तरावरून तुटवडा नाही, पुरेसा इंधन साठा उपलब्ध आहे. जनतेने घाबरून जाऊन पॅनिक होऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काही दिवसांपूर्वी गॅस सेल्समन व वितरकांची बैठक बोलावून ग्राहकांना सिलेंडर घेण्यासाठी एजन्सीवर बोलावू नये, नागरिकांना त्यांच्या दिलेल्या पत्त्यावर घरपोच डिलिव्हरी विना विलंब द्यावी, असे ठणकावून सांगितले तरीही देगलूर-मध्ये वास्तविक जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून स्थानिक गॅस वितरक ग्राहकांना घरपोच गॅस डिलिव्हरी सेवा बंद केली आहे, याचा अर्थ जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवून ग्राहकांना विनाकारण मनस्ताप देण्याचा प्रकार चालू असल्याची नागरिकांतून चर्चा ऐकीवात येत आहे.

नागरिक भल्ल्या पहाटेपासून उपाशीपोटी एजन्सी समोर सिलेंडरसाठी रांगा लावत आहेत. यामध्ये वयोवृद्ध, महिला, दिव्यांग्याचे हाल होत आहेत. वास्तविक डीएसी क्रमांक येऊन सुद्धा सिलेंडर वेळेवर मिळत नाही, अशा तक्रारी ग्राहकांकडून ऐकावयास मिळत आहेत. संबंधित पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

## सैनिकी मुलांचे वसतिगृहात कंत्राटी पद्धतीने भरती

**नांदेड (प्रतिनिधी)** –सैनिकी मुलांचे वसतिगृह विष्णुपुरी नांदेड या वसतिगृहात कंत्राटी पद्धतीने माजी सैनिक व माजी सैनिक अवलंबित-मधून माळीचे एक पद भरण्यात येणार आहे. माजी सैनिक व माजी सैनिक अवलंबित उपलब्ध नसल्यास हे पद नागरी (सिविलन) संवर्गातून भरण्यात येईल.

यासाठी वयोमर्यादा २१ ते ५० वर्षे असून वेतन १३ हजार २७१ रुपये राहील. या पदाला कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य राहील. इच्छुक उमेदवारांनी सैनिकी मुलांचे वसतिगृह नांदेड येथे सोमवार, दि. २० एप्रिलपर्यंत अर्ज दाखल करावेत. अधिक माहितीसाठी वसतिगृह अधीक्षक मो. ८३८०८७३९८५ वर संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# फुले-आंबेडकरी विचारांचा वारसा कृतीरुपात पुढे न्यावा -प्रा. डॉ. सुदाम चिंचाणे

**नांदेड (प्रतिनिधी)** – महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचा १५० वर्षांहून अधिक काळाचा वारसा आजही सामाजिक समता, शिक्षण आणि विवेकवादाचा पाया ठरत आहे. स्त्री-पुरुष समानता, जातीभेद निर्मूलन, मूर्तिपूजा व अंधश्रद्धेला विरोध आणि शेतकऱ्यांचे हक्क या तत्त्वांवर आधारित हा वारसा समतेच्या लढ्यासाठी आजही मार्गदर्शक आहे. सावित्रीमाई आणि ज्योतीबानंतर त्यांचे सुपुत्र डॉ. यशवंतराव फुले यांनी फुले-आंबेडकरांचा वैचारिक वारसा कार्यकर्त्यांनी कृती रूपात पुढे न्यावा, असे आवाहन फुले, आंबेडकरी विचारवंत प्रा. सुदाम चिंचाणे यांनी केले.




यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीपीएसएसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष एस. जी. माचनवार, बीपीएसएसचे प्रमुख मार्गदर्शक सुदाम चिंचाणे, नांदेड मसापचे जिल्हाध्यक्ष बालाजी इबितदार, नंदकुमार कोसबतवार, गोविंदराम शूरनर, गंगाधर भांगे, विश्वनाथ कोलमकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्षाच्या औचित्याने वर्षभर व्याख्यान-मालेचे आयोजन करण्यात आले आहे. यातील दुसरे व्याख्यान फुले- आंबेडकर संयुक्त जयंती सोहळ्याच्या औचित्याने शहरातील शिवाजी नगरस्थित हॉटेल विसावा पॅलेस येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. 'सत्यशोधकांचा कालातीत वारसा' या विषयावर पुढे बोलताना डॉ. चिंचाणे म्हणाले की, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यानंतर नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णराव भालेकर, बाबा आढाव, निळू फुले अशा अनेकांनी हा वारसा पुढे नेला. महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक समतेच्या चळवळींमध्ये आजही सत्यशोधक विचारांची धगधगती मशाल पहायला मिळते. आजही समाजात जातीभेद, धार्मिक द्वेष आणि विषमतेचे प्रश्न उभे असताना, सत्यशोधक समाजाचा 'मानवतावादी' विचार अत्यंत गरजेचे आहेत, असे ते म्हणाले. यावेळी संघटनेच्या वतीने डॉ. राजेश चव्हाण आणि डॉ. आशा विभुतवार यांना डॉ. यशवंतराव फुले पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दरम्यान, बालाजी इबितदार, गंगाधर भांगे, डॉ. राजेश चव्हाण, डॉ. आशा विभुतवार यांनी मनोगत व्यक्त केले. मानपत्राचे वाचन प्रा. मारुती लुटे व पी.एम. कदम यांनी केले. यावेळी संघटनेच्या वतीने म. फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे करण्याचे निश्चित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बालाजी यशवंतकर यांनी केले. प्रास्ताविक राजेश चुटकुलवार यांनी केले तर आभार प्रा. डॉ. दिलीप काठोडे यांनी मानले. कार्यक्रमाला अनेक कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक श्रोत्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# अंतेश्वर बंधारा प्रश्नावर शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** अंतेश्वर बंधारा परिसरातील बाधित शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी अंतेश्वर बंधारा संघर्ष समिती ता. पूर्णा व पालम यांच्या वतीने गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कार्यकारी अभियंता, विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र. २ कार्यालय, नांदेड येथे एकदिवसीय संबळ वाजवीत भजनी धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

या आंदोलनामध्ये गुंज, दुटका, राहाटी, भोगाव, पिंपळगाव (मु.), बरबडी, सावंगी थडी (ता. पालम) तसेच सारंगी, मिठापूर, कंठेश्वर, आजदापूर, निळा, माहागाव, कानडखेड (ता. पूर्णा) येथील शेतकरी सहभागी होणार आहेत.

संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाकडे प्रमुख मागण्या करण्यात आल्या असून, बाधित जमिनींची तत्काळ मोजणी करून भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करावी व शेतकऱ्यांना बाजारभावाच्या पाचपट दराने मोबदला द्यावा, बंधाऱ्यात स्थानिक शेतकऱ्यांसाठी ७० टक्के पाणी कायमस्वरूपी राखीव ठेवावे, वाढीव पाणीपट्टी रद्द करावी, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन प्रस्ताव तयार झाले आहेत त्यांना तत्काळ मोबदला द्यावा तसेच भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक अधिकारामुळे महिलांची प्रगती -सपोनि चिमा बोईने

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पवित्र असे संविधान या देशाला देऊन सर्वांना शिक्षणासह समानतेचा अधिकार देऊन महिलांना स्वतंत्र अधिकार दिल्यामुळे आज देशातील महिलांची प्रगती झाली आहे. महिला राष्ट्रपती, पंतप्रधान पदांसह विविध पदांवर काम करीत असल्याचे प्रतिपादन सपोनि चिमा बोईने यांनी केले. शहरातील उपसरपंचनगर स्वप्नजा गार्डन येथे आयोजित महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या संयुक्त जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर माजी शिक्षण संचालक नंदन नागरे, सेवानिवृत्त प्राध्यापक विनायक लोणे, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक प्रभाकर गिरी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक संभाजी वाठोरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष सवई, शिक्षण विस्तार अधिकारी तथा जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रदीप भगत, पत्रकार गंगाधर गच्चे, मी सावित्रीबाई फुले बोलते या एक पात्री प्रयोगाच्या सादरकर्त्या शैलजा विनायकराव लोणे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना सीमा बोईने म्हणाल्या की, या देशात पवित्र असं संविधान असून देश संविधानावर चालतो. त्या संविधानामध्ये महिलांना भरपूर अधिकार दिल्यामुळे महिलांची उन्नती झाली आहे. शिक्षणाचा अधिकार दिल्यामुळे आज महिला देशाच्या उच्च पदांवर विराजमान झाल्या आहेत.

माता सावित्रीबाई फुलेंनी शिक्षणाची पहिली शाळा पुण्यात काढून मुलींना शिक्षणाची दारे खुली केली व बाबासाहेबांनी महिलांना संविधानात अधिकार दिले. त्यामुळे महिला या आज विविध क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर स्वतंत्र जबाबदारी सांभाळत आहेत, म्हणून महिलांनी बाबासाहेबांच्या विचारांचे आचरण करावे, असे आवाहन केले.

पान १ वरून...

**पालकमंत्री अतुल सावे...**

शिखर संस्थान माहूरगड यांची भेट व दर्शन. सकाळी १०.३० वा. रेणुकादेवी माता दर्शन व परिसरातील विकास कामांची पाहणी. सकाळी ११.३० वा. शासकीय विश्रामगृह माहूरगड येथे आगमन व राखीव. दुपारी १२ वा. माहूर विकास आराखडा सादरीकरण आणि जिल्हाधिकारी व इतर संबंधित यांच्यासोबत बैठक. स्थळ-तहसील कार्यालय माहूरगड. दुपारी १ वा. सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी किनवट आणि इतर संबंधित यांच्यासोबत आदिवासी उपयोजना आणि इतर विषयी संबंधित बैठक. स्थळ तहसील कार्यालय माहूरगड. दुपारी २ वा. भोजन व राखीव. दुपारी ४ वा. शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सायं. ६ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे राखीव व मुक्काम.

शनिवार, १८ एप्रिल २०२६ सकाळी ९ वा. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे नियोजित ओबीसी स्वयंरोजगार मेळावा २०२६ निमित्त पाहणी. सकाळी १० वा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे विविध प्रशासकीय बैठका. नांदेड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था संदर्भाने प्रशासकीय अधिकारी यांची आढावा बैठक. बळीराजा शेती पाणंद रस्ते योजना आढावा बैठक. जिल्हा परिषद, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, वन विभाग इत्यादींची आढावा बैठक. दुपारी २ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. दुपारी ३ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

## हमरापूरच्या शेतकरी पुत्राचा पोलीस दलातील निवडीबद्दल सत्कार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** कष्टाच्या जोरावर जग जिंकता येते, हे हमरापूर येथील एका तरुणाने सिद्ध करून दाखवलं आहे. शेतकरी कुटुंबातील आकाश साहेबराव सोळंके याने परिस्थितीवर मात करीत पिंपरी-चिंचवड पोलीस दलात आपली जागा निश्चित केली आहे. त्याच्या या यशामुळे परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



आकाशची परिस्थिती ही इतर ग्रामीण युवकांसारखीच सामान्य होती. शेतीवर अवलंबून असलेले कुटुंब, बेताची आर्थिक ओढताण आणि ग्रामीण भागातील मर्यादित सोयीसुविधा अशा अनेक अडचणी त्याच्यासमोर होत्या. मात्र, पोलीस व्हायचेच हे स्वप्न उराशी बाळगून त्याने दिवसरात्र मेहनत घेऊन यश संपादन केले आहे.

## नगरसेवक साहेबराव गायकवाड यांचा सलग १८ तास अभ्यास उपक्रम; मान्यवरांच्या उपस्थितीत ज्ञानाला अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नगरसेवक साहेबराव गायकवाड यांच्या पुढाकारातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सहयोगनगर बुद्ध विहार येथील वातानुकूलित अभ्यासिकेत सलग १८ तास अभ्यासाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात व यशस्वीरित्या पार पडला.

या उपक्रमात सुमारे ७० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आयोजकांकडून सकाळी चहा-बिस्कीट व नाश्ता, दुपारचे जेवण, सायंकाळी फलहार तसेच रात्री जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

उपक्रमाच्या समारोपावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून या उपक्रमाबद्दलचे अनुभव व भावना व्यक्त केल्या. त्यानंतर आयोजकांकडून सर्व सहभागी विद्यार्थ्यांना संविधानाची प्रस्तावना व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

यानंतर सर्व विद्यार्थी व आयोजकांनी मिळून रात्री बारा वाजता आतीषबाजी करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत ज्ञानार्जनाचा संकल्प केला.

या उपक्रमाला भेट देण्यासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण, महानगराध्यक्ष अमर राजूरकर, महापौर कविता मुळे, सभागृह नेते महेश कनकदंडे, भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, माजी अध्यक्ष प्रवीण साले, नगरसेविका शांभवी साले, निलेश पावडे, भाजप महिला उपाध्यक्षा रेखा भताने, लीना गायकवाड यांसह अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व अशा उपक्रमांचे कौतुक करत समाजात ज्ञानाची चळवळ निर्माण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उषा पाईकराव, सोनाळे, इंद्रजीत नरवाडे, रमेश कोकरे, प्रशांत दुधमल, राजेश बिऱ्हाडे, दीपक गायकवाड, माधव वैद्य, विनायक करमकोंडा, सोपान काळबांडे, अभिजीत हनवते यांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम केवळ जयंतीपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये सातत्यपूर्ण अभ्यासाची सवय रुजवणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला.

# सोनई महिला मंडळाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अन्नदान व पाणी वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नांदेडमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच औचित्याने सोनई महिला मंडळ मगनपुराच्या वतीने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा भागात सामाजिक बांधीलकी जपत खिचडी व पाणी वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.



या अन्नदान कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड उत्तरचे भाजपाचे अध्यक्ष किशोर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून नांदेडचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, समाज कल्याणचे सह आयुक्त शिवानंद मिनगिरे, भिक्खु संघ, नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर, नांदेड जिल्ह्याचे दक्षिण आमदार आनंदराव बोंढारकर, माजी सभापती नरेंद्र गायकवाड यांची उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांच्या हस्ते जयंतीनिमित्त अभिवादन करून नागरिकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन लक्ष्मी संजय वाघमारे, अश्विन सोनुले, सविता बेटके, राहुल ग्राहक सेवा केंद्राचे राहुल जोंधळे यांच्या वतीने करण्यात आले होते.

याप्रसंगी महादेवी मठपती, लीना गायकवाड, संजय बेटके, सुमित कदम, गौतम जोंधळे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्र परिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अंतर्मन

# कर्जमुक्तीसाठी उपाय...



## वाढत्या कर्जाच्या समस्येवर कशी करावी मात, वास्तु गुरूंकडून जाणून घ्या...

**घरात अनेक प्रकारचे वास्तुदोष असतात, ज्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात. यामुळे तुमच्या घरातील आर्थिक समस्या अचानक वाढू शकतात, परिणामी कर्ज घेण्याची गरज निर्माण होते. वास्तुशास्त्रानुसार कर्ज हा एक गंभीर वास्तुदोष मानला जातो आणि त्यापासून मुक्त होण्यासाठी अनेक प्रभावी उपाय सुचवले आहेत. जर तुम्हीसुद्धा कर्जाच्या ओझ्याने त्रस्त असाल, तर वास्तु गुरू मान्या यांनी सुचवलेले छोटे बदल करून तुम्ही या परिस्थितीतून बाहेर पडू शकता...**

- मुख्य दरवाजाची दिशा : दक्षिण किंवा नैऋत्य दिशेला असलेला मुख्य दरवाजा हे कर्जाचे मुख्य कारण मानले जाते. जर तुमचा मुख्य दरवाजा या दिशेला असेल, तर तुमच्यावर कर्ज होण्याची शक्यता जास्त असते. मुख्य दरवाजासमोर कोणताही अडथळा असल्यास आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात.
- उत्तर दिशा मोकळी आणि स्वच्छ ठेवा : वास्तुशास्त्रानुसार, घराची उत्तर बाजू मोकळी आणि स्वच्छ ठेवली पाहिजे. घराची ही दिशा संपत्तीचा देव कुबेराची दिशा मानली जाते. त्यामुळे, आर्थिक प्रगतीसाठी उत्तर बाजू स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. बाहेरून सकारात्मक ऊर्जा आत येण्यासाठी घराची ही बाजू मोकळी असावी. या दिशेला जड फर्निचर ठेवणे टाळा.
- या दिशेत कचराकुंडी ठेवू नका : घराचा ईशान्य कोपरा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. तिथे कोणताही अडथळा किंवा जड वस्तू ठेवल्यास वास्तू दोष निर्माण होऊ शकतात. त्यामुळे येथील स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ईशान्य कोपऱ्यात कचराकुंडी किंवा शौचालय ठेवल्यास तुमच्या प्रगतीत अडथळा येऊ शकतो. ईशान्य कोपऱ्यात स्वयंपाकघर असल्यास तुमचा खर्च वाढतो.
- या दिशेत पाण्याशी संबंधित वस्तू ठेवू नका : घराच्या उत्तर आणि ईशान्य दिशेत जलतत्त्व ठेवणे सर्वोत्तम मानले जाते. येथे पाण्याचे कारंजे, मत्स्यालय किंवा पाण्याची टाकी ठेवता येते. तथापि, नैऋत्य दिशेत पाण्याशी संबंधित वस्तू ठेवणे टाळावे. ही दिशा स्थिरतेचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे, येथे पाणी साठवल्यास आर्थिक नुकसान होऊ शकते.
- घरातील गळतीमुळे कर्ज वाढेल : घराची आग्नेय दिशा अग्नीचे स्थान मानली जाते. त्यामुळे, या दिशेत चूल ठेवणे शुभ मानले जाते. तथापि, ईशान्य दिशेत चूल ठेवल्यास आर्थिक नुकसान होऊ शकते. घरातील जुन्या आणि खराब झालेल्या वस्तू तुमच्या प्रगतीत अडथळा आणू शकतात. सकारात्मक ऊर्जा घरात येण्यासाठी घर स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवा. शिवाय, नळांच्या गळतीमुळे देखील कर्ज वाढते.

### घरातील तिजोरीसाठी वास्तू टिप्स

वास्तुशास्त्रानुसार, घराची नैऋत्य दिशा स्थिरता आणि संपत्तीचे स्थान मानली जाते. त्यामुळे, या दिशेत पलंग, कपाट आणि तिजोरी ठेवणे शुभ मानले जाते. यामुळे संपत्ती वाढते. तिजोरी नैऋत्य भिंतीला लागून ठेवा, जेणेकरून ती उत्तरेकडे उघडेल. संपत्ती वाढवण्यासाठी ही स्थिती सर्वोत्तम मानली जाते.



# अमरनाथ यात्रा 3 जुलैपासून सुरू होणार

## नोंदणी अन् यात्रेसंबंधित महत्त्वाची माहिती जाणून घ्या...

**अमरनाथ यात्रेची तारीख जाहीर झाली आहे. अमरनाथ तीर्थक्षेत्र मंडळाने आपल्या अधिकृत वेबसाइटवर जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, यावर्षी अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होईल. हिंदू धर्मात अमरनाथ यात्रेला विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की, याच गुहेत भगवान शिवाने देवी पार्वतीला अमरत्वाचे रहस्य सांगितले होते. दरवर्षी या गुहेत नैसर्गिकरित्या बर्फाचे एक शिवलिंग तयार होते. हे शिवलिंग 'बाबा बर्फानी' या नावाने ओळखले जाते. चला, अमरनाथ यात्रेशी संबंधित सर्व महत्त्वाची माहिती जाणून घेऊया...**



अमरनाथ यात्रा ३ जुलै रोजी सुरू होणार असून, यात्रेसाठी नोंदणी १५ एप्रिलला सुरू झाली आहे. अमरनाथ यात्रा २८ ऑगस्ट रोजी समाप्त होईल. यात्रा सुरू होण्यापूर्वी, ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला, म्हणजेच २९ जून रोजी, गुहेत भगवान शिवाची विशेष प्रार्थना केली जाईल.



### अमरनाथ यात्रेचे महत्त्व


पौराणिक कथा आणि श्रद्धेनुसार, अमरनाथ यात्रा केल्याने व्यक्ती जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त होते आणि मोक्ष प्राप्त होतो. येथे दरवर्षी नैसर्गिकरित्या एक स्वयंभू शिवलिंग तयार होते. ही यात्रा केल्याने या जन्मात नकळतपणे केलेल्या पापांचे प्रायश्चित्त होते. याच गुहेत भगवान शिवाने देवी पार्वतीला अमरत्वाचे रहस्य सांगितले होते.

### अमरनाथ यात्रेसाठी नोंदणी कशी करावी?

श्री अमरनाथजी यात्रा मोबाईल अ‍ॅपवर अमरनाथ यात्रेसाठी ऑनलाइन नोंदणी करा. तुम्ही ऑफलाइन नोंदणी देखील करू शकता. तथापि, ऑफलाइन नोंदणी निवडक बँक शाखांमध्ये केली जाईल. यात्रेसंबंधित सर्व महत्त्वाची माहिती shri amarnathji yatra वेबसाइटवर दिली आहे. नोंदणीसाठी, तुम्हाला डॉक्टरांकडून आरोग्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तरच तुम्ही यात्रेसाठी नोंदणी करू शकाल. खरे तर, यात्रेचे ठिकाण उंचावर असल्यामुळे आणि तेथील भौगोलिक परिस्थिती अवघड असल्यामुळे, आरोग्य प्रमाणपत्र अनिवार्य आहे. अमरनाथ गुहेत पोहोचायला किमान तीन दिवस लागतात. या प्रवासाची सुरुवात पहलगामपासून होते, त्यानंतर पिस्सू टॉप आणि मग शेषनाग. त्यानंतर पंचतरणीला पोहोचले जाते, जिथून अमरनाथ गुहा फक्त ६ किमी अंतरावर आहे.

# अक्षय तृतीयेला केलेले दान ठरते 'महादान'

**हिंदू धर्मात अक्षय तृतीयेला विशेष महत्त्व आहे. धर्मग्रंथांमध्ये याला 'अबुझ मुहूर्त' असेही म्हटले आहे. याचा अर्थ असा की, या दिवशी कोणतेही शुभ कार्य करण्यासाठी पंचांग किंवा शुभ वेळ पाहण्याची गरज नाही. अक्षय तृतीयेच्या दिवशी दिवसभरात कोणत्याही वेळी शुभ कार्ये केली जाऊ शकतात. असे मानले जाते की या दिवशी केलेले नामस्मरण, तपश्चर्या आणि दान कधीही वाया जात नाही. असे केल्याने पिढ्यानपिढ्या पुण्य मिळत राहते. त्यामुळे या दिवशी दान करणे अत्यंत शुभ आणि फलदायी मानले जाते. अक्षय तृतीयेला सत्तू आणि फळांसहित पाच वस्तूंचे दान करणे अत्यंत पुण्यकारक आहे.**




- अक्षय तृतीयेला फळे करा दान : शास्त्र आणि पुराणांमध्ये अक्षय तृतीयेला खूप महत्त्व दिले आहे. या शुभ काळात दान करणे पुण्यकारक मानले जाते. असे मानले जाते की या दिवशी, प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार गरजू लोकांना मोसमी फळे दान करावीत. ही फळे उन्हापासून आराम देण्यास मदत करतात. तुम्ही या दिवशी आंबे देखील दान करू शकता. भविष्य पुराणानुसार, अक्षय तृतीयेला केलेले दान अक्षय बनते, म्हणजेच ते कधीही संपत नाही. त्यामुळे, हे दान खूप शुभ मानले जाते.
- पाण्याचे भांडे दान करा : शास्त्रांमध्ये उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे भांडे दान करण्याचे विशेष महत्त्व सांगितले आहे. त्यामुळे, अक्षय तृतीयेला, तुम्ही एखाद्या गरीब किंवा गरजू व्यक्तीला पाण्याचे भांडे दान करू शकता. पाणीदान करणे हे देखील एक महान दान मानले जाते, ज्यामुळे प्रचंड पुण्य मिळते. याव्यतिरिक्त, शक्य असल्यास, प्राणी आणि पक्ष्यांनाही पाणी द्यावे. असे केल्याने देवाचा आशीर्वाद मिळतो आणि जीवनात आनंद व शांती येते.
- सत्तू दान करा : पंडित राकेश झा सांगतात की वैशाख महिन्यात सत्तू दान करणे आवश्यक आहे. या महिन्यात सत्तू दान केल्याने अत्यंत शुभ परिणाम मिळतात. क्षमतेनुसार या दिवशी गरजू व्यक्तीला सत्तू दान करू शकता. सत्तू उन्हाळ्याच्या दिवसात दिलासा देणारा मानला जातो. म्हणूनच अक्षय तृतीयेला सत्तू दान करणे शुभ मानले जाते.
- सोन्याचे दान करणे अत्यंत शुभ : हिंदू धर्मात सोन्याचे दान करणे हे देखील एक महान दान मानले जाते. शुभ प्रसंगी, भक्त आपल्या क्षमतेनुसार सोन्याचे दान करतात. असे केल्याने जीवनात शुभ फळे मिळतात, असा विश्वास आहे. तथापि, आजकाल सोन्याचे भाव गगनाला भिडत आहेत. जर तुम्हाला सोन्याचे दान करणे परवडत असेल, तर त्याऐवजी जव दान करता येते. असे मानले जाते की जव दान केल्याने सोन्याच्या दानाप्रमाणेच लाभ मिळतो. शिवाय, यामुळे व्यक्तीचे सुख आणि समृद्धी वाढू शकते.
- अक्षय तृतीयेला गव्हाचे दान : शास्त्रांमध्ये अक्षय तृतीयेला अन्नधान्य दान करण्याचे विशेष महत्त्व सांगितले आहे. असे मानले जाते की या दिवशी अन्न, धान्य आणि इतर वस्तूंचे दान केल्याने शाश्वत लाभ मिळतो. जर सोने किंवा जव दान करणे शक्य नसेल, तर तुम्ही गहू देखील दान करू शकता. गरजू व्यक्तीला गहू दान केल्याने पुण्य मिळते. शिवाय, गहू सूर्याशी संबंधित मानला जातो आणि यावेळी अक्षय तृतीया रविवारी येत आहे. त्यामुळे, या दिवशी गहू दान केल्याने सूर्य बलवान होतो आणि त्याचा शुभ प्रभाव तुमच्या जीवनात टिकून राहतो.

# राहू महादशा अन् अंतर्दशेदरम्यान मोरपंखाचे उपाय करतील मन शांत!,

**व्यक्तीला आयुष्यात कधी ना कधी नऊ ग्रहांच्या महादशा आणि अंतर्दशेला सामोरे जावे लागते. प्रत्येक ग्रहाच्या स्थितीचे वेगवेगळे परिणाम असतात. नऊ ग्रहांपैकी, राहू आणि केतू यांना छाया ग्रह किंवा पाप ग्रह मानले जाते. पौराणिक कथेनुसार, समुद्रमंथनातून राहू आणि केतू यांचा जन्म झाला. जर एखादी व्यक्ती राहूच्या महादशेतून जात असेल, तर कुंडलीतील राहूच्या स्थितीमुळे यश मिळवणे कठीण होऊ शकते. तथापि, राहूच्या महादशेत मोराच्या पिसांचा वापर करून काही सोपे उपाय केल्यास, राहूचे प्रतिकूल परिणाम कमी करता येतात. ज्योतिषाकडून राहूच्या महादशेत मोराच्या पिसांचा वापर करून करता येणाऱ्या सोप्या उपायांबद्दल जाणून घेऊया...**

राहूला गोंधळ, भीती आणि अचानक येणाऱ्या संकटांचा ग्रह मानले जाते. तथापि, निसर्गात एक असा पक्षी आहे जो राहूची नकारात्मक ऊर्जा शांत करू शकतो. जर कोणी राहूच्या महादशेतून जात असेल, तर त्यांनी मोरासोबत वेळ घालवावा. असे केल्याने ऊर्जा शांत होते. राहूच्या महादशेदरम्यान, आपल्या घरात किंवा पर्समध्ये मोराचे पीस ठेवा. यामुळे तुमचे मन शांत होण्यास आणि राहूचा प्रभाव हळूहळू संतुलित होण्यास मदत होईल. ज्या व्यक्तींची राहूची महादशा सुरू आहे, त्यांनी आपल्या शयनकक्षात, विशेषतः ज्या खोलीत ते झोपतात, तिथे मोराचे पीस ठेवावे.

### राहूची महादशा किती काळ टिकते?

ज्योतिषशास्त्रानुसार, राहूची महादशा १८ वर्षे टिकते आणि शुभ-अशुभ चक्र ३, ६ आणि ९ वर्षे चालू राहते. राहूच्या महादशेच्या सहाव्या आणि आठव्या वर्षात व्यक्तीला सर्वाधिक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. तथापि, जर कुंडलीत राहू शुभ स्थितीत असेल, तर या महादशेदरम्यान राहू एखाद्या व्यक्तीला दरिद्रीतून राजा बनवू शकतो. तो अचानक यश मिळवून देऊ शकतो आणि मोठे यश मागे सोडू शकतो. जर राहू अशुभ स्थितीत असेल, तर तो व्यक्तीच्या जीवनात अनेक समस्या निर्माण करू शकतो.

### राहू महादशेची लक्षणे...

- अचानक पैशांचे नुकसान होणे किंवा अनावश्यक खर्च होणे.
- विनाकारण चिंता करणे किंवा चिडचिड होणे.
- राहू महादशेदरम्यान, व्यक्तीची इलेक्ट्रॉनिक उपकरणे वारंवार बिघडतात किंवा चोरीची सतत भीती वाटते.
- पैसे कमावण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करण्याचा विचार मनात येणे.
- घरात वाळवी इत्यादी समस्या उद्भवणे.
- जेव्हा राहू अशुभ असतो, तेव्हा व्यक्ती वाईट सवयींकडे आकर्षित होते.

# मोहिनी एकादशी कधी आहे? 26 की 27 एप्रिल? अचूक तारीख अन् शुभ वेळ जाणून घ्या...

**मोहिनी एकादशी वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या एकादशीला साजरी केली जाते. हा दिवस विश्वाचे रक्षक भगवान विष्णूच्या आवडत्या एकादशी तारखांपैकी एक आहे. या दिवशी भक्त उपवास करतात आणि भगवान विष्णूच्या मोहिनी रूपाची पूजा करतात. मोहिनी एकादशीला योग्य विधींनी भगवान विष्णूची पूजा केल्याने पापे आणि दुःखे नष्ट होतात आणि सांसारिक आसक्तींपासून मुक्ती मिळते. मोहिनी एकादशीची अचूक तारीख आणि शुभ वेळ जाणून घेऊया...**



हिंदू पंचांगानुसार, एकादशीची तारीख रविवार, २६ एप्रिल रोजी सायंकाळी ६:०८ वाजता सुरू होते आणि सोमवार, २७ एप्रिल रोजी सायंकाळी ६:१७ पर्यंत चालते. त्यामुळे, उदय तिथीनुसार, मोहिनी एकादशीचे व्रत २७ एप्रिल, २०२६ रोजी पाळले जाईल. व्रत सोडण्याची वेळ मंगळवार, २८ एप्रिल रोजी सकाळी ५:३८ ते सकाळी ८:१७ पर्यंत असेल.

- ब्रह्म मुहूर्त पहाटे ४:१२ ते पहाटे ४:५५ पर्यंत
- अभिजीत मुहूर्त सकाळी ११:४९ ते दुपारी १२:४२ पर्यंत
- विजय मुहूर्त दुपारी २:२८ ते दुपारी ३:२१ पर्यंत
- अमृत काळ दुपारी २:४१ ते दुपारी ४:२० पर्यंत



### महत्त्व..

असे मानले जाते की, मोहिनी एकादशीच्या दिवशी भगवान विष्णूने देवांना अमृत दिले होते. या दिवशी भगवान हरीसोबत देवी लक्ष्मीचीही पूजा केली जाते. असे केल्याने आर्थिक अडचणी दूर होतात आणि जीवनात सुख-समृद्धी येते. मोहिनी एकादशीला अन्न, वस्त्र आणि गूळ दान केल्याने गरिबी दूर होण्यास मदत होते.

### पूजेची पद्धत

सकाळी ब्रह्म मुहूर्तावर उठून आपले घर स्वच्छ करा. त्यानंतर, अंघोळीच्या पाण्यात थोडे तीळ घालून स्नान करा. पूजेच्या ठिकाणी एका लाकडी चौथऱ्यावर पिवळे वस्त्र पसरा. आता, त्यावर भगवान विष्णूची मूर्ती ठेवा. भगवान हरींना पिवळ्या चंदनाचा लेप, अख्खे तांदळाचे दाणे, पिवळी फुले आणि तुळशीची पाने अर्पण करा. यानंतर, भगवान हरींना पंचामृत आणि पिवळ्या रंगाची मिठाई अर्पण करा. मोहिनी एकादशी व्रताचा जप करा. पूजेच्या शेवटी, तुपाच्या दिव्याने भगवान हरींची आरती करा.

# विनोद कांबळींना 'ब्रेन स्ट्रोक'चा धोका

## तेंडुलकरसह माजी क्रिकेटपटू मदतीसाठी धावले





**मुंबई (प्रतिनिधी)** – भारतीय क्रिकेट विश्वातील एकेकाळचा चमकता तारा विनोद कांबळी सध्या अत्यंत कठीण प्रसंगातून जात आहेत. कांबली यांना गंभीर आजाराने ग्रासले असून त्यांना 'ब्रेन स्ट्रोक'चा मोठा धोका असल्याचा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. या कठीण काळात त्यांचे बालपणीचे मित्र सचिन तेंडुलकर यांच्यासह अनेक माजी क्रिकेटपटूंनी मदतीचा हात पुढे केला आहे.

कांबळी यांचे मित्र मार्कस कौटो यांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद कांबळी यांच्या मेंदूमध्ये रक्ताची गाठ तयार झाली आहे. सुरुवातीच्या काळात याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आता ती काढणे कठीण झाले आहे. यामुळे त्यांच्या स्मरणशक्तीवर गंभीर परिणाम झाला असून, त्यांना साध्या गोष्टीही आठवत नाहीत. प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. आदिल छागला यांनी स्पष्ट केले आहे की, त्यांची ही स्थिती 'ब्रेन स्ट्रोक'कडे झुकत आहे. कांबळी यांना आपल्याला काय आजार आहे आणि काय टाळायचे आहे, याचे भान राहत नाही. त्यांनी मद्यपान सोडले असले तरी, विस्मरणापोटी ते अनेकदा रस्त्यावरील अनोळखी व्यक्तींकडे किंवा रिक्षाचालकांकडे सिगरेट मागतात. लोक त्यांना 'कांबळी' म्हणून प्रेमाने सिगरेट देतात, परंतु हीच सिगरेट त्यांच्या जीवावर बेतू शकते, अशी भीती त्यांच्या मित्रांनी व्यक्त केली आहे.

कांबळी यांची आर्थिक स्थितीही बेताची असल्याने त्यांच्या मित्रांनी पुढाकार घेतला आहे. मार्कस कौटो यांनी सांगितले की, त्यांनी माजी क्रिकेटपटूंचा एक व्हॉट्सप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून अनेक खेळाडू नाव न सांगता कांबळी यांना आर्थिक मदत करत आहेत. यामध्ये सचिन तेंडुलकर देखील सक्रियपणे लक्ष देऊन असल्याचे समजते. काही काळापूर्वीच कांबळी यांनी 'युरिनरी इन्फेक्शन'वर मात केली आहे. सध्या ते नीट चालत असले तरी, मेंदूतील गुंतागुंत हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा अडथळा ठरत आहे. त्यांचे मित्र आणि डॉक्टरांची टीम त्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहे.

विनोद कांबळी यांनी १९९३ ते २००० दरम्यान भारतासाठी १७ कसोटी आणि १०४ एकदिवसीय सामने खेळले. विनोद कांबळी १००० कसोटी धावा करणारे सर्वात जलद भारतीय फलंदाज आहे. हा एक विक्रम आजपर्यंत कायम आहे. १९९१ मध्ये आंतरराष्ट्रीय कारकीर्द सुरू करूनही, भारतासाठी १०४ एकदिवसीय सामने आणि १७ कसोटी सामने खेळूनही त्यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द एका दशकापेक्षा कमी काळ टिकली. कांबळी यांनी १७ कसोटी सामन्यात ५४.२० च्या सरासरीने १०८४ धावा केल्या. यामध्ये चार शतके आणि तीन अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय, त्यांनी १०४ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३२.५९ च्या सरासरीने २४७७ धावा केल्या. यामध्ये दोन शतके आणि १४ अर्धशतकांचा समावेश आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याने १२९ सामन्यांमध्ये ५९.६७ च्या सरासरीने ९९६५ धावा केल्या. यामध्ये ३५ शतके आणि ४४ अर्धशतकांचा समावेश आहे.

## लखनऊमध्ये आगीत ४ मुलांचा होरपळून मृत्यू

**लखनऊ (वृत्तसंस्था)** – लखनऊमध्ये बुधवारी संध्याकाळी साडेपाच वाजता भीषण आग लागली. विकासनगर परिसरात लागलेल्या या आगीत ३० हून अधिक सिलेंडर फुटले. २५० हून अधिक झोपड्या जळून खाक झाल्या. सुमारे १० किलोमीटर दूरपर्यंत आगीच्या ज्वाळा दिसल्या. आग लागल्यानंतर आसपासची सुमारे २० घरे रिकामी करण्यात आली.

अग्निशमन दलाच्या २० गाड्यांनी सुमारे ३ तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. यादरम्यान परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला. एका तरुणाचे म्हणणे आहे की, त्याच्या ४ मुलांचा जळून मृत्यू झाला आहे. इतर लोकांचे सर्व सामान जळून खाक झाले. ज्यांच्या झोपड्या जळाल्या, ते लोक रडत-ओरडत राहिले. काही लोकांचा आरोप आहे की, जाणूनबुजून आग लावण्यात आली आहे. मुख्यमंत्री योगी यांनी आगीच्या घटनेची दखल घेत अधिकाऱ्यांना तात्काळ घटनास्थळी पोहोचण्याचे निर्देश दिले. उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनीही घटनास्थळी भेट दिली आणि अधिकाऱ्यांना बचाव कार्य वेगाने करण्याचे आदेश दिले.

# कोटा येथे स्लिपर बसच्या अपघातात ३ जणांचा मृत्यू तर २० जखमी

**कोटा (प्रतिनिधी)** – कोटा येथे स्लीपर बसच्या अपघातात तीन लोकांचा मृत्यू झाला. अपघातात २० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. प्रवाशांचा दावा आहे की बसच्या पुढील आरशावर कोणीतरी दगड मारला होता, त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले.

अनियंत्रित झाल्यामुळे बस दुभाजक ओलांडून दुसऱ्या लेनमध्ये घुसून उलटली. उलटल्यामुळे तुटलेल्या काचेच्या भागातून प्रवासी बाहेर रस्त्यावर पडले. समोरून येणाऱ्या ट्रॉलीने तिघांना चिरडले. हा अपघात शहराच्या आरकेपुरम पोलीस स्टेशन हद्दीतील नयागाव पुलाजवळ बुधवारी रात्री सुमारे १२ वाजता झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, खाजगी कंपनीची बस अहमदाबादहून ग्वाल्हेर-भिंडच्या दिशेने जात होती. बसमध्ये बहुतेक प्रवासी मध्य प्रदेशचेच होते.

बस उलटल्यामुळे प्रवासी आतमध्ये वाईट रीतीने अडकले. प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी रात्री सुमारे २.३० वाजेपर्यंत बचावकार्य (रेस्क्यू ऑपरेशन) चालवण्यात आले. अपघातात २० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना कोटा येथील मेडिकल कॉलेजच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर, ट्रोलाने चिरडल्यामुळे ज्या तीन लोकांचा मृत्यू झाला आहे, त्यापैकी दोघांची ओळख पटू शकलेली नाही. पोलिसांच्या माहितीनुसार, ज्या लोकांचा अपघातात मृत्यू झाला आहे ते ड्रायव्हर केबिनमध्ये बसले होते. बस उलटताच केबिनचा पुढचा आरसा तुटल्याने हे लोक रस्त्यावर पडले. त्याच वेळी समोरून येणारा ट्रोला या लोकांवरून गेला.

### जाहिर प्रगटन

(एक्सप्लोझीव नियम, २००८ चे कलम १०३ (३) (ओ) नुसार)

विषयः- नियोजित गट नं. १०८ (पार्ट) मौजे तामसा, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

संदर्भः- विभागीय किरकोळ विक्री प्रमुख, इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लिमिटेड, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र AURDO/TAMSA, दिनांक १७-०५-२०२३

विभागीय किरकोळ विक्री प्रमुख, इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लिमिटेड, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी मौजे तामसा, तालुका हदगांव जि.नांदेड येथील गट क्रं. १०८ (पार्ट) मध्ये नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. प्रस्तुत ठिकाणी नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी कंपनीने श्री दिपक तुकाराम देशमुख रा. तामसा, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड (९८९०४१६१६१) यांना डिलरशिप दिलेली आहे.

सदरील पेट्रोलपंप उभारायचा भुखंड ( गट क्रं. १०८ (पार्ट) मौजे तामसा, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड ) हा श्रीमती सुरेखा तुकाराम देशमुख,, श्री राजेंद्र तुकाराम देशमुख, श्री दिपक तुकाराम देशमुख , श्री दिनेश तुकाराम देशमुख , श्रीमती सविता मधुसुदन देवडे रा. तामसा, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड यांच्या सामाईक मालकीचा असुन सदर जमिनीचे एकूण क्षेत्र ०.५३.०० आर पैकी ०.२० आर इतके आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित जागेत इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, औरंगाबाद यांना नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसाचे आत लेखी आक्षेप/हरकती कार्यालयीन वेळात समक्ष सादर कराव्यात मूदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

मूदतीत प्राप्त आक्षेप/हरकती सुनावणी घेऊन अंतीम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

Digitally signed by
AMBEKAR KIRAN CHANDRAKANT
Date: 15-04-2026 18:52:40

अपर जिल्हादंडाधिकारी, नांदेड

### जाहिर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेच्या व संबंधितांच्या माहितीस्तव हे जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील सर्वे नं. 47/2 सि.स.नं. 8411 पैकी राजेंद्रनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. नांदेड मधील (प्लॉट क्रं. 15) क्षेत्रफळ 334.51 चौ.मी. ज्याची चतु:सिमा पुर्वेस-9.14 मी. रुंद रस्ता, पश्चिमेस-प्लॉट नं. 14, दक्षिणेस-प्लॉट नं. 16 व उत्तरेस-9.14 मी. रुंद रस्ता, येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील प्लॉट क्रं. 15 हा संस्थेचे सभासद श्री. दत्तात्रय वाघंबर बिरादार यांना प्लॉट प्रमाणपत्राद्वारे वाटप केलेला असून त्यानंतर सौ. रेखा रमेश अकमार यांनी सदरील प्लॉट क्रं. 15 वर बांधकाम केलेल्या संतोष रेसिडेन्सी नामे अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रं. एस-02, ज्याचे चटई क्षेत्रफळ 1236.58 चौ.फुट आहे. वऱ्याच्या चतु:सिमा पुर्वेस-फ्लॅट क्रं. एस-01, पश्चिमेस-कोनाळे, माकने, मुंढे यांचा प्लॉट, दक्षिणेस-पाथरे यांचे घर, उत्तरेस-अंतर्गत रस्ता, येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील फ्लॅट क्रं. 02 हा श्री. दत्तात्रय पि. वाघंबर बिरादार यांनी सौ. रेखा रमेश अकमार यांना कायमचा विक्री करण्याचा सौदा केला आहे. असें अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते परंतू आता अर्जदार सौ. रेखा रमेश अकमार यांनी त्यांना संस्थेचा सभासद करुन घेणे व फ्लॅट क्रं. 02 चे वाटप प्रमाणपत्र देण्याबाबत संस्थेकडे अर्ज वर नमुद आवश्यकती कागदपत्रे संस्थेकडे सादर केलेली आहेत. तरी कागदपत्रांची छान्नी करुन वर नमुद प्रमाणे सौ. रेखा रमेश अकमार यांचे नावे फ्लॅट क्रं. एस-02 क्षेत्रफळ 1236.58 चौ.फुट हस्तांतरण करण्यास कोणाचा काही आक्षेप किंवा उजर असल्यास अथवा सदर फ्लॅट वर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत किंवा इतर कोणत्याही हितसंबंध असल्यास हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 07 दिवसाचा आत संबंधीतानी आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या कार्यालयात लिखीत स्वरुपात सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व सौ. रेखा रमेश अकमार यांना सभासद करुन घेण्यात येईल.

सबब हे जाहिर प्रगटन.

मार्फत
ॲड शैलेष साहेबराव देशमुख
रा. राजेंद्रनगर, नांदेड
मो.नं. 9422056330

# दिल्ली विमानतळावर अकासा एअर आणि स्पाइसजेट विमानांचा अपघात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – दिल्ली विमानतळावर गुरुवारी दुपारी २ वाजता पार्किंग परिसरात उभ्या असलेल्या अकासा एअरलाइनच्या विमानाला स्पाईसजेटच्या विमानाची धडक बसली. दोन्ही विमानांचे नुकसान झाले आहे. या अपघातात प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत.

स्पाईसजेटच्या प्रवक्त्यानुसार, या घटनेत स्पाईसजेटच्या विमानाचा उजवा पंख खराब झाला आहे. दुसऱ्या अकासा विमानाच्या पंख्याचेही नुकसान झाले आहे. या घटनेनंतर, हे स्पाईसजेट विमान दिल्लीत थांबवण्यात आले असून त्याचा वापर उड्डाणांसाठी केला जाणार नाही. फ्लाइटरडार२४ नुसार, लेहहून येणारे स्पाईसजेटचे विमान गेटजवळ येत असताना आणि अकासा एअरचे विमान हैदराबादकडे परत जात असताना ही घटना घडली.

अकासा एअरने एका निवेदनात म्हटले आहे, प्राथमिक माहितीनुसार, आमचे विमान उभे असताना दुसऱ्या एअरलाइनच्या विमानाची त्याला धडक बसली. सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. प्रवाशांना लवकरात लवकर हैदराबादला पाठवण्यासाठी ग्राउंड टीम पर्यायी व्यवस्था करत आहे.

### Change In Name

My old name **SHEIKH ABED MANNAN SHEKH** which now I am changing as New Name **SHEIKH ABED SHEKH MANNANMIYA.** Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same.

**Address- FSHEIKH ABED SHEKH MANNANMIYA. H.No.3-82, Ziya Colony Degloor Tq. Degloor Dist. Nanded Mo. No.7028759365**

### टी.सी. हरवली

माझी सानिका प्रभाकर कांबळे या नावाची बारावी पासची टी.सी. तरोडा नाका ते मालेगाव प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**सानिका प्रभाकर कांबळे**
**रा. मालेगाव ता.जि.नांदेड**
**मो.नं. ८१४९०२८७५७**

### जाहीर प्रगटन

ज्या अर्थी अर्जदार विठ्ठलराव मारोती बोडके रा. जाहूर ता. मुखेड त्यांचे पत्नीचे नामे शांताबाई विठ्ठलराव बोडके रा. जाहूर यांची जन्माची दिनांक ०२/०४/१९६३ मौ. राजूरा बु. ता. मुखेड जि. नोंड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म मृत्यू निबंधक ग्रामपंचायत अधिकारी राजूरा बु. ता. मुखेड यांना आदेशित करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्या अर्थी, शांताबाई विठ्ठलराव बोडके रा. जाहूर येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पत्नीचे नामे शांताबाई विठ्ठलराव बोडके रा. जाहूर यांची जन्माची दिनांक ०२/०४/१९६३ मौ. राजूरा बु. ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याकरीता कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांमध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपल आक्षेप नोंदवावा, विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर सादर न केल्यास अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**तालुका दंडाधिकारी, मुखेड**

### जाहिर प्रगटन

माझ्या पक्षकार सुनयना धोंडीराम गबाळे, रा. एन.डी. ४२, डि-३, २४/२ सिडको, नांदेड, ता.जि. नांदेड यांनी मला दिलेल्या अधिकार, माहिती आणि पुरविलेल्या कागदपत्रावरुन खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

सर्व जनतेस या जाहीर प्रगटना व्दारे सुचित करण्यात येते की, माझ्या पक्षकार जुना मोंढा ते सिडको ॲटोने प्रवास करतांना घर क्र. एन.डी. ४२, डि-३, २४/२ सिडको, नांदेड, ता.जि. नांदेड या घराचे सह दुय्यम निबंधक कार्यालय, नांदेड येथील नोंदणीकृत मुळ डिड ऑफ असाईनमेंट क्र. ६४५७ व नोंदणीकृत मुळ लिजडिड क्र. ६४५६ दोन्ही ही दिनांक २७/०७/२०११ हरवले आहेत. त्या संबंधाने माझ्या पक्षकाराने दिनांक १५/०४/२०२६ रोजी सिडको प्रशासक कार्यालय नविन नांदेड यांचेकडे सदर दोन्हीही मुळ दस्त हरवल्या बावत रितसर अर्ज दिला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस आवाहन करण्यात येते की, वर नमुद वर्णनांचे दस्त कोणास सापडल्यास त्यांनी खालील पत्यावर आणुन दयावे किंवा खालील दिलेल्या मोबाईलवर संपर्क करावा. त्यास योग्य ते बक्षिस देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत: (सही)
ॲड. एस.टी.भाले
सर्वे क्र. 50, प्लॉट क्र. 221,
गोदावरी हातमाग वस्त्र निर्माण सहकारी संस्था,
सिडको रोड, वसरणी, नांदेड
ता.जि. नांदेड मो.क्र. 9421757718

प्रगटन देणार
सुनयना धोंडीराम गबाळे,
रा. एन.डी. ४२, डि-३, २४/२ सिडको,
नांदेड, ता.जि. नांदेड मो.क्र. 9421380933

### जाहीर प्रगटन

मौजे बाभुळगाव ता.जि. नांदेड ग्रामपंचायत हद्दीतील शेत गट नं. २९ पैकी प्लॉट नं. १११ ज्याची लांबी दक्षिण-उत्तर ४० फुट व रूंदी पूर्व-पश्चिम ३० फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ.फुटाचा प्लॉट गुलाम रामकिश कदम रा. मंगलसांगवी ता. कंधार जि. नोंदड यांचेकडून नागेश दिनकरराव आष्टुरकर रा. हडको नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १४०, पश्चिमेस - ३० फुट रूंद रोड, दक्षिणेस - प्लॉट नं. ११२ व उत्तरेस - १५ फुट रूंद रोड.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत नागेश दिनकरराव आष्टुरकर यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**नागेश दिनकरराव आष्टुरकर**
**रा. हडको नांदेड**

### Change In Name

My Old Name is **GAVALE SHITAL PARSHURAM** which now I am changing as New Name **SHITAL HARIDAS SHINDE.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H.No.22, AT HALDAV POST, Loha, PO: Loha, DIST: Nanded, Maharashtra-431708 Mo. No. 9860447505


### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८





**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## विद्यार्थ्यांच्या सुरक्षित भवितव्यासाठी सर्वंकष उपाययोजना करणार : जिल्हाधिकारी कर्डिले

### ◆ जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी समितीची बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड हे शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनले असून, राज्यभरातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. या विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात दर्जेदार शिक्षण मिळावे आणि त्यांचे भवितव्य उज्वल व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सर्वंकष उपाययोजना करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी समितीची बैठक पार पडली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तसेच कोचिंग क्लासेसचे प्रतिनिधी उपस्थित होते. शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी क्लासेस परिसरात 'दामिनी पथक' व इतर पथकांमार्फत पोलीस गस्त वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देशही पोलीस विभागाला देण्यात आले.

मेडिकल स्टोअर्समध्ये अंमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री होऊ नये, तसेच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री टाळावी, याबाबत दुकानदारांनी दक्षता घ्यावी. यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कठोर देखरेख ठेवावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी शिक्षण विभागाने विविध प्रबोधनात्मक उपक्रम राबवावेत, अशा सूचना देण्यात आल्या. बैठकीदरम्यान कोचिंग क्लासेसच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या समस्याही ऐकून घेण्यात आल्या. दरम्यान, दि. २० ते २४ एप्रिल २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १० ते १२ या वेळेत शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडिअम येथे पालक व विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना सुरक्षित, निरोगी व सकारात्मक वातावरणात शिक्षण मिळावे, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी नमूद केले.

## जिल्हा मध्यवर्ती बँकेला ५३.७ कोटींचा नफा; ६३ पैकी २८ शाखा नफ्यात



### खतगावकर यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन २०२५- २०२६ या आर्थिक वर्षात्त भागभांडवलमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यावर्षी मार्च अखेर बँकेला ढोबळ नफा ५३.७ कोटी रुपये झाला तर वैधानिक तरतुदीनंतर निव्वळ नफा ७.३३ कोटी रुपये झाला. एनपीए कमी झाला असल्याची माहिती नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी गुरुवार, दि. १६ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

या बँकेच्या पुनर्उभारणीमध्ये महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण व तत्कालीन अर्थमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचेही खतगावकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जिल्हा मध्यवर्ती बँकेवरचा ग्राहकांचा विश्वास वाढला असून, बँकेमध्ये मोठ्या प्रमाणात ग्राहक ठेवी जमा करत आहेत. बँकेच्या एकूण ६३ शाखा असून, ५८ शाखा नफ्यात आल्या आहेत. ही प्रगती केवळ आकड्यापुरती मर्यादित नसून ती आपल्या संचालक मंडळाची व बँक व्यवस्थापनाची असल्याचेही खतगावकर यांनी म्हटले आहे.

बँकेच्या या अर्थपूर्ण वाटचालीमध्ये बँकेचे संचालक मंडळ, कर्मचारी, सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याचेही बँकेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी सांगितले.

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरेकर, संचालक बाळासाहेब रावणगावकर, गोविंदराव पाटील शिंदे, बाबुराव कोंढेकर, शिवराम लुटे, राजेंद्र केशवे, राजेश पावडे, व्यंकटराव जाळणे, विजयाताई शिंदे, शाम कदम, रामचंद्र मुसळे, माजी उपमहापौर सरजीतसिंग गील, एन. डी. पवार, जगनाथ चक्रावार, बँकेचे सीईओ अजय कदम व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत चोरट्यांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने प्रयत्न करत असलेल्या रेल्वे सुरक्षा दल, नांदेड विभागाने ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत विविध रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्या संशयितांना यशस्वीरित्या ताब्यात घेतले.

रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी २३.०५ वाजता अमोल वावळे, एएसआय/सीआयबी/नांदेड यांनी शासकीय रेल्वे पोलीस, परभणी यांच्या पथकासह परभणी रेल्वे यार्ड येथे प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्यांविरुद्ध गुप्त पाहणी केली. या कारवाईदरम्यान पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी रवींद्र याला ताब्यात घेण्यात आले.



तपासणीदरम्यान त्याच्याकडे एक स्पोर्ट्स बॅग आढळून आली. ज्यामध्ये विविध कंपन्यांचे एकूण पाच चोरीचे मोबाईल फोन (रिअलमी ०२, रेडमी ०१, इन्फिनिक्स ०१, पोको ०१) मिळून आले, ज्यांची एकूण किंमत ६३,४०० आहे. चौकशीदरम्यान त्याने कबूल केले की, हे मोबाईल परभणी रेल्वे स्थानकावर विविध गाड्यांमधून प्रवाशांकडून चोरी केले आहेत. आरोपीसह जप्त माल शासकीय रेल्वे पोलीस, परभणी यांच्या ताब्यात देण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १२४ अंतर्गत गुन्हा क्रमांक १९०/२०२६, दि. १२ एप्रिल २०२६ नोंदविण्यात आला आहे.

तसेच दि. १३ एप्रिल २०२६ रोजी १४.३० वाजता सीआयबी-डीअँडआय/नांदेड, आरपीएफ छत्रपती संभाजीनगर पोस्ट आणि शासकीय रेल्वे पोलीस, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त पथकाने दिलीप कांबळे, एसआयपीएफ/सीआयबी/नांदेड यांच्या नेतृत्वाखाली स्थानक परिसरात गुप्त पाहणी केली. या कारवाईदरम्यान रेल्वे प्लॅटफॉर्मवर गाड्यांच्या थांब्यादरम्यान चोरी करण्याच्या उद्देशाने संशयास्पद हालचाली करत असलेल्या तीन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले.



**नांदेड** –अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक कै. अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाध्यक्ष दशरथ कपाटे यांच्या आयोजनातून नेरली कुष्ठधाम येथे अन्नदान करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य शे. रा. पाटील, विभागीय अध्यक्ष व्ही. टी. शिंदे, मराठा कुणबी महासंघाचे अध्यक्ष गिरीश जाधव, जिल्हाध्यक्ष सतीशकुमार जाधव, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष भगवान कदम, शिवसेना तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, मुस्लीम आघाडीचे जिल्हाध्यक्ष सत्तार पठाण, दशरथ कदम, पंकज उबाळे, डॉ. गणेश कदम, नवनाथ जोगदंड, अवधूत कदम, माधव आढाव, श्याम देवकांबळे, सनाउल्ला शेख, संभाजी कपाटे, गणेश कपाटे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## शिक्षण विभागाच्या मनमानी कारभाराविरुद्ध शिक्षक सेनेचे ढोल बजाओ आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या मनमानी आणि ढिसाळ कारभारामुळे जिल्ह्यातील हजारो कार्यरत आणि सेवानिवृत्त शिक्षकांची आर्थिक कोंडी झाली आहे. प्रशासनाला जागे करण्यासाठी आणि भ्रष्ट यंत्रणेचा पर्दाफाश करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, नांदेडतर्फे जिल्हा परिषदेसमोर ढोल बजाओ आंदोलन करण्यात आले.

शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष तथा शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या आदेशानुसार ढोल बजाओ आंदोलन करण्यात आले. प्रशासकीय दिरंगाईमुळे हक्काचे बजेट ३१ मार्च रोजी परत गेले आहे. टॅब २.० च्या बिलांमध्ये मोठा घोळ आहे आणि सेवानिवृत्त शिक्षकांना त्यांच्या हक्काच्या ७ व्या वेतन आयोगाचे हप्ते आणि चट्टोपाध्याय श्रेणीच्या फरकासाठी चकरा माराव्या लागत आहेत. या आंदोलनातून शिक्षक सेनेने प्रशासनाला जाब विचारला आहे. बजेटची जाणीवपूर्वक नासाडी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, प्रलंबित बिलांची कारणे देऊन त्वरित देयके अदा करावी, सेवानिवृत्तांचे वेतन निश्चिती आणि फरकाची आयोगाचे हफ्ते रक्कम तात्काळ खात्यात जमा करावेत.

सर्व कार्यरत शिक्षक आणि सेवानिवृत्त शिक्षक बांधव आपल्या न्याय्य हक्कासाठी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, परशुराम येसलवाड, तानाजी पवार, जिल्हा सरचिटणीस रवी बंडेवार, गंगाधर करेवार, गंगाधर कदम, मनोहर भंडेवार, वसंत सिरसाट, जिल्हा उपाध्यक्ष शिवकुमार निलगीरवार, अविनाश चिद्रावार, बालाजी गेंदेवाड, सचिन गायकवाड, शेख मैनोदीन, बी. जी. डफडे, सय्यद अली, रमण काब्दे, सिरसाळकर, आर. एच. पवार, दत्ता पेंढारकर, बस्वराज मठवाले, रामदास देशमुख, मोतेवार पुरुषोत्तम, वाकोरे, व्यंकट चिलरवार, बालाजी डोंगळीकर, टर्के विलास, पवळे बालाजी, मुटकलवार, बालाजी गुंडले, भगवान सोनटक्के, शिक्षक सेनेचे तालुका पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी तसेच सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी उपस्थित होते. या आंदोलनाला शिक्षक परिषदेचे पदाधिकारी व अखिल संघटनेचे पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला असल्याचे सांगण्यात आले.

## परशुराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)**– राजस्थानी विप्र समाज, नांदेड यांच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव २०२६ निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १८ व १९ एप्रिल रोजी होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

१८ एप्रिल रोजी राजस्थानी विप्र महिला संघटन, नांदेड यांच्यातर्फे मीरा एक अलौकिक प्रेम गाथा या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियम परिसर, नांदेड येथे होणार आहे. या कार्यक्रमाच्या प्रोजेक्ट चेअरमन म्हणून सौ. संगीता नरेश धाणीवाल कार्य पाहणार आहेत.

१९ एप्रिल रोजी गायत्री मंदिर, नवीन पूलजवळ, जुना मोंढा, नांदेड येथे सकाळी ९ वाजता भगवान परशुराम पूजन, सकाळी ९ ते १२ भजन आणि दुपारी १२ वाजता महाआरती आयोजित करण्यात आली आहे. आरतीनंतर महाप्रसादाचेही आयोजन चाणक्य ब्राम्हण महासभा महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने करण्यात येणार आहे. याच दिवशी राजस्थानी विप्र युवा संघटन नांदेडच्या वतीने सायंकाळी ५ वाजता शोभायात्रा काढण्यात येणार असून, ही यात्रा हनुमान टेकडी येथून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र, सोमेश कॉलनीपर्यंत जाणार आहे. शोभायात्रेनंतर श्री.स्वामी समर्थ अन्नछत्रतर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात दोन ठिकाणी चोरीच्या घटना; लाखोंचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील भोकर व कंधार तालुक्यात चोरीच्या दोन वेगवेगळ्या घटना घडल्या आहेत. यात अज्ञात चोरट्यांनी लाखोंचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी कंधार आणि भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोकर शहरात १५ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास बिलालनगर परिसरात घडली. अज्ञात चोरट्यांनी उभ्या असलेल्या (एम.एच.-२४-एसएस-७६६८) क्रमांकाच्या कारचे काच फोडून कारमधील सुमारे ८ लाख १० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी बळवंत तुळशीराम शिखरे (वय ५३, रा. बाचोटी, ता. कंधार) यांनी दिलेल्या तक्रारीवरून भोकर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसऱ्या घटनेत कंधार तालुक्यातील मानसपुरी येथे १४ एप्रिल रात्री ११ ते १५ एप्रिल सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली. अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून चांदीची छत्री, पंजा व सात कडे असा एकूण सुमारे ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी शेख चांद शेख लाल (वय ५५, व्यवसाय शेती, रा. मानसपुरी, ता. कंधार) यांनी दिलेल्या तक्रारीवरून कंधार ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## सचखंड गुरुद्वाऱ्यात वैशाखी महल्ला कार्यक्रम भक्तीभावाने साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील सचखंड गुरुद्वाऱ्यात मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी पारंपरिक खालसा पंथ साजना दिवस (स्थापना दिवस) व वैशाखी महल्ला मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या सोहळ्यात देश-विदेशातून तसेच स्थानिक परिसरातून आलेल्या हजारो शीख व अन्य धर्मीय भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

सकाळी पंजप्यारे साहिबान यांच्या हस्ते बाणीचे पठण करून अमृत तयार करण्यात आले. त्यानंतर शेकडो शीख धर्मीय अनुयायांना शीख मयदिनुसार अमृतपान (पाजवून) देऊन खालसा पंथाची दीक्षा देण्यात आली.

गेल्या चार-पाच दिवसांपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रात्री रैन सवाई कीर्तन, कथा, श्री गुरु ग्रंथ साहिबजी यांचे अखंड पाठ तसेच लंगरची व्यवस्था करण्यात आली होती. गुरुद्वारा गेट क्रमांक ५ समोर भुजंगी सेवक जत्थ्याच्या वतीने आयोजित पाच दिवसीय पाठ, कीर्तन व कथांचा समारोपही पार पडला. यानंतर हजारो भाविकांनी लंगरचा लाभ घेतला.



१५ एप्रिल रोजी सहायक जत्थेदार (पुजारी) भाई रामसिंघ यांच्या अरदास केल्यानंतर वैशाखी महल्ल्याची सुरुवात झाली. या भव्य मिरवणुकीत संचखड गुरुद्वाऱ्याचा ऐतिहासिक निशान साहिब तसेच परिसरातील विविध गुरुद्वाऱ्यांचे निशान साहिब सहभागी झाले होते. बोले सो निहाल, सत् श्री अकालच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे सोने व चांदीच्या अलंकारांनी सजवलेले गुरु महाराजांचे घोडे होते. या घोड्या व्यतिरिक्त एका घोड्यावर नगारची सिंघ बसून पारंपरिक नगारा वाजवत होता, ज्यामुळे संपूर्ण वातावरण अधिक दिमाखदार व उत्साहपूर्ण झाले. तसेच मिरवणुकीत कीर्तनी जत्थे, वारकरी संप्रदायाची भजनी मंडळे, ढोल-ताशा पथके तसेच गतका जत्थ्यांनी तलवारबाजी, दांडपट्टा आदी कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिके सादर केली.

मिरवणूक गुरुद्वारा गेट क्रमांक १ पासून हनुमान मंदिर मार्गे, संत बाबा निधान सिंघजी चौक (गुरुद्वारा चौक), महावीर चौकजवळील हल्लाबोल चौकापर्यंत पोहोचली. तेथे अरदास करण्यात आल्यानंतर 'हल्लाबोल बोले सो निहाल सत् श्री अकाल'च्या गजरात निशान साहीब घेऊन निशानची सिंघजी व घोडे हातात खुल्या तलवारी व शस्त्रे घेऊन भाविकांनी पारंपरिक उत्साहात जोरात पळत पुढील प्रवास सुरू ठेवला. हल्लाबोल चौक ते चिखलवाडीपर्यंत धाव घेतल्यानंतर तेथे पोहोचल्यावर मार्गातील अनेक भाविकांनी आपल्या घरासमोर निशान साहिबाची आरती ओवाळून मिरवणुकीचे स्वागत केले.

यानंतर मिरवणूक बावली साहिब येथे पोहोचली, जिथे थंड पेये व लंगरची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. तेथे पाठ व कीर्तन झाल्यानंतर मिरवणूक हिंगोली गेट, बाफना अबचलनगर मार्गे पुन्हा संचखड गुरुद्वाऱ्यात परतली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com